रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १५ ◆ अंक २४५
www.ramprahar.com
# राम प्रहर
शनिवार, २५ मार्च २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## प्रतीक्षा बागडी ठरली पहिली महिला 'महाराष्ट्र केसरी'

**सांगली :** महाराष्ट्रात पहिल्यांदाच महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



सांगली येथे ही महिला कुस्ती स्पर्धा रंगली. या स्पर्धेत सांगलीतील प्रतीक्षा बागडी आणि कल्याणमधील वैष्णवी पाटील यांच्यात शुक्रवारी (दि. २४) अंतिम लढत होऊन प्रतीक्षाने वैष्णवीला चितपट करीत पहिली महिला महाराष्ट्र केसरी होण्याचा मान पटकाविला आहे. सांगली-मिरज रस्त्यावरील जिल्हा क्रीडा संकुलामध्ये महिला महाराष्ट्र केसरी पदकासाठी कुस्ती स्पर्धा गुरुवारपासून सुरू होती. अंतिम सामन्यात तुंग (जि. सांगली) येथील बागडी आणि पाटील यांच्यात शुक्रवारी सायंकाळी लढत झाली. या सामन्यात बागडी व पाटील मध्यंतरापर्यंत चार गुणांनी बरोबरीत होत्या, मात्र मध्यंतरानंतर बागडीने पाटीलला चितपट करीत चार विरुद्ध दहा गुणांनी महिला केसरी पदकावर मोहोर उमटवली.



**आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधिवेशनात उठविला पनवेल बस आगाराविषयी आवाज**

(वृत्त उद्याच्या अंकात)

# काँग्रेस नेते राहुल गांधी यांची खासदारकी रद्द

### मानहानीप्रकरणी लोकसभा सचिवालयाची कारवाई



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मोदी आडनावाबद्दलच्या मानहानी प्रकरणात सुरत न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावल्यानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे संसद सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. लोकसभा सचिवालयाने ही कारवाई करीत राहुल यांना खासदार म्हणून अपात्र ठरविले आहे.

राहुल गांधी यांनी गेल्या लोकसभा निवडणुकीत कर्नाटकमधील कोलार येथे आयोजित सभेत बोलताना सर्व चोरांचे आडनाव मोदी कसे, असा प्रश्न विचारत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर अश्लाघ्य भाषेत टीका केली होती. राहुल यांनी केलेल्या या बदनामीकारक विधानामुळे संपूर्ण मोदी समुदायाचा अपमान झाल्याचे सांगत भाजपचे गुजरातमधील आमदार पूर्णेश मोदी यांनी याविरोधात सुरत जिल्हा सत्र न्यायालयात खटला दाखल केला होता. या प्रकरणी गुरुवारी न्यायालयाने राहुल गांधी यांना दोषी ठरवत दोन वर्षांची शिक्षा सुनावली. ते केरळमधील वायनाडमधून खासदार होते.

दरम्यान, न्यायालयाने राहुल गांधी यांना जामीनही दिला आहे, पण शिक्षेला स्थगिती दिली नसून वरच्या कोर्टात अपील करता यावे यासाठी ३० दिवसांचा वेळ दिला आहे, मात्र शिक्षा झाल्याने राहुल यांचे संसद सदस्यत्व रद्द झाले आहे. त्यांच्यासह काँग्रेससाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

### ...तर आज ही वेळ आली नसती!

काँग्रेस नेते राहुल गांधींची खासदारकी रद्द करण्यात आली आहे. त्यांनी २०१३मध्ये एक मसुदा फाडला नसता तर त्यांना ते आज वरदान ठरले असते. या संदर्भातील व्हिडीओही व्हायरल होत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने खासदार आणि आमदारांसदर्भात २०१३मध्ये एक निर्णय दिला होता की, कोर्टाने जर शिक्षा सुनावली तर तत्काळ प्रभावाने त्यांची सदस्यता रद्द केली जाईल. कोर्टाच्या या निर्णयाला बगल देण्यासाठी तत्कालीन युपीए सरकारने नवे विधेयक आणले. राहुल गांधी यांनी विरोध करीत या विधेयकाला 'नॉनसेन्स' असे संबोधत प्रस्तावित अध्यादेशाची प्रत फाडून टाकली होती. जर हा कायदा तेव्हा मंजूर झाला असता, तर आज राहुल गांधी यांची खासदारकी रद्द झाली नसती, असे म्हटले जात आहे.

# प्रकल्पग्रस्तांच्या उन्नतीसाठी उपाययोजना करणार

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची ग्वाही

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रकल्पग्रस्त जमिनी देतात. म्हणूनच मोठमोठे विकास प्रकल्प उभे राहतात. त्यामुळे राज्याच्या विकासात प्रकल्पग्रस्तांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी राज्य शासन आवश्यक त्या सर्व उपाययोजना करेल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (दि. २४) विधान परिषदेत सांगितले. रोजगार, स्वयंरोजगार, कौशल्य विकास, उद्योग आदी माध्यमातून त्यांना उन्नतीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी



सर्वंकष धोरण तयार करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

याबाबत सविस्तर माहिती देताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्य शासनामार्फत २१ जानेवारी १९८०च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्त अथवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना शासकीय सेवेतील भरतीमध्ये एकूण जागांच्या किमान पाच टक्केपर्यंत सर्वोच्च प्राधान्यक्रम देण्यात आले होते. तथापि, त्यानंतर उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात दिलेल्या विविध निर्णयांनुसार शासकीय, निमशासकीय आणि अधिपत्याखालील सर्व कार्यालयांमधील रिक्त पदे भरण्याबाबत सर्व प्रसारमाध्यमांतून जाहिरात प्रसिद्ध करून अर्ज मागविण्यात यावेत असे निर्देश दिले. त्यानुसार १९ नोव्हेंबर २००३ रोजी शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले. यानंतरदेखील न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांवरील निर्णयानंतर शासनाने २७ ऑक्टोबर २००९च्या शासन निर्णयानुसार सुधारित आदेश निर्गमित केले. त्यानुसार प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्या जाहिरातीशिवाय व त्यांची सेवाप्रवेश अर्हता व गुणवत्ता डावलून करता येणार नाहीत.

### सचिवांची समिती नेमणार

प्रकल्पग्रस्तांना न्याय देणे आवश्यक आहे ही शासनाची भूमिका आहे. प्रकल्पग्रस्तांची संख्या सुमारे चार लाख आहे. त्या तुलनेत नोकऱ्या मिळण्याची संख्या अल्प आहे. ही सद्यःस्थिती लक्षात घेता न्यायालयाचा अवमान न होता अन्य मार्गांनी प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्यासाठी मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागांच्या सचिवांची समिती नेमण्यात येईल, असे या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसित ठिकाणी जागा दिल्यानंतर त्यांना कब्जेहक्काची रक्कम माफ करण्याबाबत तपासून निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी अन्य एका उपप्रश्नाला उत्तर देताना सांगितले.



**मुंबई : पद्मविभूषण आशा भोसले यांना शुक्रवारी गेट वे ऑफ इंडिया येथे आयोजित समारंभात महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री सुधीर मुनगंटीवार, भारतरत्न सचिन तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थित होते. २५ लाख रुपये रोख, मानपत्र, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.**

# बेकायदेशीर कंटेनरयार्ड चालवणाऱ्या भूमाफियावर कारवाई करा -आमदार महेश बालदी

### ▮ तातडीने कारवाई करण्याचे विधानसभा अध्यक्षांकडून निर्देश

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडकोच्या जागेवर बेकायदेशीर कंटेनरयार्ड चालवणाऱ्या भूमाफियावर कारवाई करा, अशी मागणी उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी शुक्रवारी (दि. २४) विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली. त्या अनुषंगाने विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर यांनी तातडीने कारवाई करण्याचे निर्देश सिडकोला दिले.




सिडकोने संपादन केलेल्या जागेवर भूमाफिया बेकायदेशीर कंटेनर यार्ड चालवत असून या प्रकरणी तेथील ग्रामपंचायत सदस्यांनी उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांकडे तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीची दखल घेत त्यांनी नवी मुंबई पोलिसांना पत्र पाठवले होते. त्या अनुषंगाने नवी मुंबई पोलिसांनी त्याचा पूर्ण तपास करून सिडको व्यवस्थापकीय संचालकांना गुन्हा दाखल करण्यास सांगितले, मात्र सिडको याबाबत टाळाटाळ करीत आहे. यामुळे शासनाने सिडको व्यवस्थापकीय संचालकांना निर्देश देऊन पोलिसांनी दिलेल्या पत्रानुसार कारवाई करावी, अशी मागणी आमदार महेश बालदी यांनी सभागृहात केली.

या महत्त्वपूर्ण विषयाची दखल विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर यांनी घेत शासनाने त्वरित सिडकोच्या महाव्यवस्थापकांना संबंधित अधिकाऱ्यांना योग्य ते आदेश देण्याचे निर्देश दिले.

## निवडक

### मुंबईत माथेफिरूच्या चाकूहल्ल्यात तिघांचा मृत्यू, दोन जण जखमी

**मुंबई :** ग्रँट रोड परिसरात एका माथेफिरूने चाकूहल्ला केल्याची भयंकर घटना शुक्रवारी (दि. २४) घडली. या घटनेत तिघांचा मृत्यू आणि दोन जण जखमी झाले आहेत. चेतन गाला (वय ५४) असे आरोपीचे नाव असून त्याचे पत्नीसोबत वाद होते. पत्नीला शेजारी फूस लावतात, असा त्याला संशय होता. यातूनच त्याने हे कृत्य केले. पोलिसांनी माथेफिरूला ताब्यात घेतले आहे.

### सरकारी कर्मचाऱ्यांच्या नव्या पेन्शनचा घेतला जाणार आढावा

**नवी दिल्ली :** सरकारी कर्मचाऱ्यांच्या नव्या पेन्शन योजनेचा (एनपीएस) केंद्र सरकार आढावा घेणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शुक्रवारी (दि. २४) संसदेत वित्त विधेयक मांडताना ही माहिती दिली. वित्त सचिवांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन करण्यात येईल, जी नव्या पेन्शन योजनेचा आढावा घेणार आहे, असे या वेळी अर्थमंत्र्यांनी सांगितले.

# महालक्ष्मी सरस प्रदर्शनात रायगडच्या रूचा समुहाची देशात सर्वाधिक विक्री

### उत्कृष्ट जिल्हा समन्वय अधिकारी म्हणून सिद्धेश राऊळांचा गौरव



**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण योजनेंतर्गत जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नवी मुंबईतील वाशी येथे महालक्ष्मी सरसचे आयोजन करण्यात आले होते. या विक्री प्रदर्शनात रायगड जिल्ह्याच्या पेण तालुक्यातील रूचा समुहाने सर्वाधिक विक्री केली. त्याचप्रमाणे जिल्हा विपणन व्यवस्थापक सिद्धेश चंद्रकांत राऊळ यांनी उत्कृष्ट जिल्हा समन्वय अधिकारी म्हणून काम केले. याबद्दल त्यांनाही गौरविण्यात आले.

महालक्ष्मी सरस विक्री प्रदर्शनात देशभरातून ५७० स्वयंसहाय्यता समुहांनी सहभाग घेतला तसेच या प्रदर्शनात ७० खाद्यपदार्थांचे स्टॉल ग्राहकांच्या सेवेसाठी ठेवण्यात आले होते. ग्रामीण भागातील महिला स्वयंसहाय्यता समुहाने बनविलेल्या विविध वस्तूंची विक्री ८ ते २१ मार्च या कालावधीत करण्यात आली.

या प्रदर्शनात रायगड जिल्ह्यातून १० समुहांनी सहभाग घेतला होता. यापैकी पेण तालुक्यातील रूचा समुहाने सर्वाधिक विक्री केल्याबद्दल उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी परमेश्वर राऊत, अवर सचिव धनवंत माळी व राज्य अभियान व्यवस्थापन कक्षातील अधिकारी यांच्या हस्ते मानचिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले तसेच जिल्हा विपणन व्यवस्थापक सिद्धेश राऊळ यांना उत्कृष्ट जिल्हा समन्वय अधिकारी म्हणून गौरविण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील समूहांना मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व प्रकल्प संचालक डॉ. सत्यजित बडे यांचे मार्गदर्शन लाभले.

## मुलीच्या लग्नाची तारीख ठरवण्यासाठी जाताना अपघात

### एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

**लातूर : प्रतिनिधी**

मुलीच्या लग्नाची तारीख ठरवण्यासाठी जाणाऱ्या



कुटुंबाच्या गाडीचा अपघात होऊन एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू, तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. लातूरमध्ये निलंगा ते औराद महामार्गावर ही दुर्दैवी घटना घडली.

चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने भरधाव वेगात असणारी कार रस्त्यालगतच्या शेतात जाऊन उलटली. अपघातातील लोक हे चाकूर येथील रहिवासी आहेत. मुलीच्या सोयरीकीसाठी ते औरादकडे जात होते, अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे.

भगवान मारोती सावळे, विजयमाला भाऊराव सावळे, लता भगवान सावळे, राजकुमार सुधाकर सावळे यांचा मृतांमध्ये समावेश आहे, तर दोन जण गंभीर जखमी झाले असून त्यांना निलंगा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना सरकारचा दिलासा

# मुलाखतीसाठी ईएसडब्ल्यू प्रमाणपत्राची अट शिथिल

**मुंबई : प्रतिनिधी**

एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना राज्य सरकारने दिलासा दिला आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे (ईएसडब्ल्यू) प्रमाणपत्र नसेल तरीही विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी संधी देण्याची मुभा राज्य सरकारने दिली आहे.

गेल्या काही दिवसांपासून एमपीएससीचे विद्यार्थी आपल्या विविध मागण्या सरकारपुढे ठेवत होते. त्यांच्या मागण्या सरकारने मान्यही केल्या आहेत. आता या विद्यार्थ्यांना आणखी एक मोठा दिलासा मिळाला आहे. ईएसडब्ल्यू प्रमाणपत्राची अट शिथिल झाली आहे.

कोरोना काळामुळे ईएसडब्ल्यू प्रमाणपत्र न निघाल्याने विद्यार्थ्यांची



मोठी अडचण झाली होती. याबद्दल विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर राज्य सरकारने ईएसडब्ल्यू प्रमाणपत्र नसेल तरीही विद्यार्थ्यांना मुलाखतींसाठी संधी देण्याची मुभा देण्याचा निर्णय घेताला आहे. याबद्दलचा शासननिर्णयही प्रसिद्ध करण्यात आला आहे. याबद्दल स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

# पनवेलच्या सूकापूरमध्ये सरपंच चषक क्रिकेट स्पर्धा

### ▪ भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील सुकापूर येथे सुकापूर प्रीमियर लीग व ग्रामस्थ मंडळ यांच्या वतीने सरपंच चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २४) झाले. या वेळी त्यांनी खेळाडूंना शुभेच्छा देत प्रोत्साहित केले.

सुकापूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज मैदानात २४ ते २६ मार्चदरम्यान ही स्पर्धा खेळली जात आहे. स्पर्धेत विजेत्या पहिल्या तीन संघांना रोख रक्कम व भव्य चषक देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, नेरे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, सरपंच योगिता पाटील, उपसरपंच दिवेश भगत, किशोर सुरते, प्रमोद भिंगारकर, ज्ञानेश्वर पाटील, अप्पा गायकवाड, आत्माराम पाटील, ग्रामपंचायत सदस्य संदीप म्हसकर, पुष्पा म्हसकर, अनिता पाटील, पूनम भगत, माजी उपसरपंच बुवाशेठ भगत, रेणुका खुटले, माजी उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य अशोक पाटील, आलुराम केणी, माजी ग्रामपंचायत सदस्य परशुराम पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्य योगेश पाटील, महिला मोर्चा सरचिटणीस प्रिया वाघमारे, विनायक शेळके, शिवराम शेळके, चांगदेव ठाकूर, संजय पाटील, प्रकाश म्हसकर, अनंत पाटील, प्रमोद भगत, प्रदीप ठाकरे, आयोजक राजेश पाटील, महेश पाटील, गुरूनाथ पोपेटा, पंकज पोपेटा, रूपेश पाटील, निलेश पोपेटा, रोशन जाधव, प्रशांत लांगडे, धीरज फुलोरे, राहुल पोपेटा, उदय म्हसकर, मोहन दळवी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, क्रीडाप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# किल्ले रायगडावर शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची येत्या ६ एप्रिल रोजी ३४३वी पुण्यतिथी आहे. या निमित्ताने किल्ले रायगड येथे श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ व स्थानिक उत्सव समिती महाड यांच्या वतीने ५ व ६ एप्रिलला श्री शिवपुण्यतिथी अभिवादनासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांची प्रमुख पाहुणे म्हणून त्याचबरोबर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, प्रशासनातील अधिकारी यांची उपस्थिती लाभणार आहे.

५ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता शिवसमाधी आणि जगदीश्वर मंदिर दीपवंदना, रात्री ८.३० वा. पुरस्कारप्राप्त मान्यवरांच्या मुलाखती (राजसभेत), ९.३० वा. शाहीर किरणसिंग सुरज राऊळ जळगाव यांचा शाहिरी कार्यक्रम ही रात्र शाहिरांची (राजसभेत) आणि १० वा. जगदीश्वर मंदिरात हरिजागर होणार आहे. ६ एप्रिलला पहाटे ५ वा. श्री जगदीश्वर पूजा, सकाळी ६ वा. हनुमान जन्मोत्सव, ८ वा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीची पूजा, ९ वा. राजदरबार येथे शिवप्रतिमा पूजन, सैन्यदल अधिकारी आणि सरदार घराणे यांचा सन्मान, गडरोहण स्पर्धा बक्षीस वितरण सोहळा, शिवपुण्यस्मृती रायगड पुरस्कार वितरण, शिवरायमुद्रा स्मरणिका प्रकाशन, प्रमुख पाहुणे यांचे मनोगत, ११ वा. शिवप्रतिमेची पालखीतून मिरवणूक राजदरबार ते शिवसमाधी, ११.३० वा. शिवछत्रपतींना सर्व शिवभक्त व रायगड जिल्हा पोलिसांकडून मानवंदना आणि दुपारी १२ वा. शिवभक्तांना होळीचा माळ येथे महाप्रसादाचे वितरण केले जाईल.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने मराठ्यांच्या समाधीस्थळांचे अभ्यासक प्रवीण भोसले यांना श्री शिवपुण्यस्मृती रायगड पुरस्कार, तर सैन्यदल अधिकारी ले. जनरल सुदर्शन हसबनीस (निवृत्त), शूर सरदार हरजीराजे महाडीक यांचे वंशज यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे, सरकार्यवाह पांडुरंग बलकवडे, कार्यवाह सुधीर थोरात आणि स्थानिक उत्सव समिती महाडचे अध्यक्ष त्रिंबक पुरोहित, कार्यवाह संतोष कदम यांनी केले आहे.

## विरारमध्ये ट्रेनच्या धडकेत तिघांचा मृत्यू

**विरार : प्रतिनिधी**

विरार रेल्वेस्थानकात रूळ ओलांडताना भरधाव ट्रेनच्या धडकेत एकाच कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली शुक्रवारी (दि. २४) रात्री घडली. मृतांमध्ये पती, पत्नीसह तीन वर्षांच्या बाळाचा समावेश आहे.

पश्चिम रेल्वेच्या विरार रेल्वेस्थानकात एका दाम्पत्याने रेल्वे ब्रिजवरून न जाता रेल्वे रूळ ओलांडण्याचा मार्ग अवलंबला. प्लॅटफॉर्म क्रमांक चार व पाचमधील रूळ ओलांडताना भरधाव येणाऱ्या मेल एक्स्प्रेसने त्यांना जोरदार धडक दिली. अजितकुमार पटेल (२८), सीमादेवी पटेल (२६), आर्यन पटेल (३ महिने) अशी मृतांची नावे आहेत. पटेल कुटुंबीय मुळचे जौनपुर येथील असल्याची माहिती समोर आली आहे.

# वाहतुकीस शिस्त लावण्यासाठी कडक उपाययोजना -उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील अपघात कमी करण्यासाठी अद्ययावत आयटीएम्स यंत्रणा बसविण्यात येत असून वाहतुकीला शिस्त लागावी यासाठी वाहतुकीचे नियम तोडणाऱ्या वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येत असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत सांगितले.

जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील अपघात कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत सदस्य भाई



जगताप यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला होता.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील अपघात कमी करण्यासाठी वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी अत्याधुनिक आयटीएम्स यंत्रणा बसविण्यात येणार आहे जेणेकरून लेनची शिस्त न पाळणाऱ्यांवर कारवाई करता येईल. मिसिंग लिंक देखील पूर्ण होणार आहे. तसेच आताही लेनची शिस्त न पाळणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांद्वारे कारवाई करण्यात येत आहे. तसेच मोटार वाहनांचा दंड वसुली करण्यासाठीही सर्व वाहनचालकांचे अद्ययावत मोबाईल क्रमांकाची माहिती करण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

### जव्हार तालुक्यातील रस्ते मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून

पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील



मनमोहोडी या गावातील रस्ते मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत पूर्ण करणार असल्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी विधानपरिषदेत सांगितले. पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील मनमोहोडी या गावातील आदिवासी ग्रामस्थांना मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत विधानपरिषद सदस्य प्रसाद लाड यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला होता.



## मुंबई-पुणे महामार्गावर बर्निंग कारचा थरार

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर खंडाळा घाटात आडोशी बोगद्याजवळ मुंबईकडे जाणाऱ्या कारने अचानक पेट घेतला. सुदैवाने त्या वेळी कारमध्ये कोणीही प्रवासी नव्हते. महामार्गावरील देवदूत यंत्रणा, आय आर बी, महामार्ग पोलीस, व इतर यंत्रच्या सहाय्याने आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले.

या घटनेमुळे महामार्गावरील वाहतूक काळी काळासाठी ठप्प झाली होती. मात्र काही वेळाने ही वाहतूक संबंधित विभागाने सुरळीत केली. ही शुक्रवारी (दि. २४) सायंकाळी पाचच्या दरम्यान घडली.

### राहुल गांधींविरोधात आज मुंबई भाजपतर्फे निषेध आंदोलन

**मुंबई : प्रतिनिधी**

मोदी या नावावरून राहुल गांधी यांनी ओबीसी समाजाचा अपमान केल्याबद्दल राहुल गांधी यांच्या वक्तव्याचा जाहीर निषेध आंदोलन उद्या (दि. २५) सकाळी १०.३० वाजता दक्षिण मुंबई जिल्ह्यातर्फे कोटक महिंद्रा बँक जवळ, भारतमाता थिएटर समोर, लालबाग येथे आयोजित केले आहे.

दक्षिण मुंबई जिल्ह्यातील सर्व जिल्हा पदाधिकारी, विधानसभा पदाधिकारी, वार्ड पदाधिकारी, आघाडी पदाधिकारी अपेक्षित आहेत. सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन दक्षिण मुंबई जिल्हाध्यक्ष शरद चिंतनकर यांनी केले आहे. या आंदोलनात कॅबिनेट मंत्री आमदार मंगल प्रभात लोढा, मुंबई अध्यक्ष आशिष शेलार उपस्थित राहणार आहेत.

## रसायनी रेल्वे फाटक ठरतेय नागरिकांसाठी डोकेदुखी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी रेल्वेस्टेशनजवळच कष्टकरी नगर, तुराडे ठाकूरवाडी, जूनी पोसरी गाव तसेच पोसरी ठाकूरवाडी ही गावे वसलेली आहेत. येथील नागरिक रसायनीतील पाताळगंगा परिसरातील कारखान्यात कामधंदासाठी जातात, परंतु सकाळ किंवा संध्याकाळी रेल्वेस्टेशन पलिकडील नागरिकांना कामाला जायच्या वेळेवर रसायनीतील रेल्वेस्टेशन फाटक त्यांच्या पोटापाण्याच्या नोकरीवर मारक ठरतो.

नेमके कामाच्या वेळीच फाटक बंद होत असल्याने नागरिकांना येथेच ताटकळत उभे राहावे लागते. रेल्वे प्रशासनाने काही कालावधीपूर्वी नागरिकांच्या सुव्यवस्थेसाठी भुयारी मार्ग स्वरूपात उजव्या बाजूने मार्ग काढला, परंतु दोन-तीन महिन्यांचा कालावधी सोडला, तर या मार्गाचा नागरिकांना काहीएक उपयोग झाला नाही व रेल्वे प्रशासनाने काढलेल्या अंडरग्राउंड भुयारी मार्गावर खर्च केलेले लाखो रूपये पाण्यात गेले.

त्यातून नागरिकांची नित्याचीच गैरसोय होवून नोकरीच्या ठिकाणी वेळेवर न जाता येत असल्यामुळे नोकरीवर टांगती तलवार आली आहे. याची रेल्वे प्रशासनाने लवकरात लवकर दखल घेऊन या भागातील नागरिकांची समस्या सोडवावी, अशी या भागातील नागरिकांची मागणी आहे.

## माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या वाढदिवसानिमीत्त घंटागाडीचे लोकार्पण



**पेण : प्रतिनिधी**

माजी आमदार तथा भाजप नेते धैर्यशील पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुढीपाडव्याच्या शुभदिनी कामार्ली ग्रामपंचायत येथे माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते घंटा गाडीचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी माजी जि.प. अध्यक्षा नीलिमा पाटील, माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील, जि.प. माजी सभापती महादेव दिवेकर, बापू दळवी, युवा नेते ललित पाटील, युवा नेते मंगेश दळवी, मयूर वनगे, माजी नगरसेवक अजय क्षीरसागर, कामार्ली सरपंच नामदेव पवार, उपसरपंच रमाकांत पाटील, गजानन मोरे, सापोली सरपंच सुमन हंबिर, आंबेघर उपसरपंच मंगेश काईनकर उपस्थित होते.

यावेळी । युवा नेते मंगेश दळवी यांनी सांगितले, गेल्या दोन वर्षांच्या कालावधीनंतर मी पुन्हा समाजाच्या आनंदासाठी व विकासासाठी सक्रिय होत आहे. आता माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पूर्व विभागाच्या विकासाचा बॅकलॉग भरून काढला जाईल, असे आश्वासन त्यांनी केले. याप्रसंगी माजी आमदार धैर्यशील पाटील, माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी आरोग्य सेविका, आशा सेविका यांचा सत्कार करण्यात आला तसेच उपस्थीत सर्व महिलांना डस्टबिनचे वाटप करण्यात आले. खेळ पैठणीचा सन्मान महिलांचा कार्यक्रमात खास आकर्षण असलेल्या तुझी माझी रेशीम गाठ मालिकेतील अभिनेत्री अंकिता भगत आणि नृत्यांगना सोनाली पवार यांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष टेंबे यांनी केले.

## खोपोली येथे उद्या हिंदू राष्ट्र-जागृती सभा



**खोपोली : प्रतिनिधी**

लव्ह जिहाद, धर्मांतर, हलाल जिहाद, वक्फ बोर्डचा लॅण्ड जिहाद, गोहत्या अशा विविध मार्गांतून देश आणि हिंदु धर्म यांवर आघात आणि अन्याय होत आहेत. हिंदु धर्म आणि हिंदूंवर होणार्या या अनेक आघातांना वाचा फोडण्यासाठी, हिंदु राष्ट्र स्थापनेची मागणी करण्यासाठी, तसेच हिंदूंच्या व्यापक संघटनासाठी हिंदु जनजागृती समिती आणि समस्त हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या वतीने श्री समर्थ मंगल कार्यालय, श्री समर्थ कृपा हॉटेल शेजारी, मुंबई पुणे जुना हायवे, खोपोली येथे रविवार, २६ मार्च २०२३ या दिवशी सायं. ६ वा. हिंदु राष्ट्र-जागृती सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेच्या निमित्ताने सभेच्या निमित्ताने २४ मार्च या दिवशी खोपोली येथे वाहनफेरी काढण्यात आली. या वाहनफेरीला हिंदुत्वनिष्ठ आणि धर्मप्रेमी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

खोपोली येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथून आरंभ झालेल्या या फेरीमध्ये वेध सह्याद्री, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, सह्याद्री प्रतिष्ठान, विश्व हिंदु परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, वारकरी संप्रदाय, जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संप्रदाय, सनातन संस्था, हिंदु जनजागृती समिती आदी विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी तसेच धर्मप्रेमी १०० हून अधिक दुचाकी वाहनांसह उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. फेरीत असणारे भगवे ध्वज, धर्माभिमानी हिंदूंनी परिधान केलेले भगवे फेटे, फेरीत देण्यात आलेल्या हिंदुत्व जागृत करणाऱ्या घोषणा यांमुळे अवघे खोपोली भगवेमय झाले होते. मान्यवर वक्त्यांनी पाटणकर चौक येथे वाहनफेरीच्या सांगता समारोहात प्रबोधन केले आणि येथे फेरीची सांगता करण्यात आली.

हिंदु जनजागृती समिती आणि विविध हिंदुत्वनिष्ठ संघटना यांचे कार्यकर्ते खोपोलीमधील विविध भागात बैठका, व्याख्याने, हस्तपत्रके, भित्तीपत्रके, फ्लेक्स फलक या माध्यमांतून प्रसार करत आहेत तसेच व्हाटस्एप, ट्विटर, फेसबुक या सोशल मिडियाच्या माध्यमांतूनही मोठ्या प्रमाणात या सभेचा प्रसार करण्यात आला असून लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद याला लाभत आहे. या सभेला हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक सुनील घनवट यांच्यासह विविध मान्यवर वक्त्यांचे मार्गदर्शन लाभेल.

## शिवसेना वैद्यकीय कक्षाच्या कर्जत तालुका समन्वयकपदी मनीषा दळवी

**कर्जत : प्रतिनिधी**

शिरसे ग्रामपंचायतमधील माजी उपसरपंच मनीषा दळवी यांची शिवसेना वैद्यकीय कक्षाच्या कर्जत तालुका समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर कर्जत शहर मदत कक्ष प्रमुख म्हणून मुद्र भागातील कार्यकर्ते उदय शिंदे यांची निवड करण्यात आली आहे.

शिवसेना वैद्यकीय कक्षाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यात वैद्यकीय सेवा आणि रुग्णवाहिका यांच्या माध्यमातून मदत देण्याचे काम सुरू आहे. याच शिवसेना मदत कक्ष आणि वैद्यकीय कक्षाच्या माध्यमातून राज्यातील गोरगरीब रुग्णांना सेवा देण्याचे काम ठाणे येथील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्क कार्यालयातून होत असते. त्याच माध्यमातून कर्जत तालुक्यात शिवसेना वैद्यकीय कक्ष तसेच मदत कक्षाचे काम सुरू असून या कक्षाचे कर्जत तालुका समन्वयक म्हणून मनीषा दळवी यांची नियुक्ती ठाणे येथील राज्य कार्यालयातून करण्यात आली आहे. दळवी शिवसेनेच्या महिला आघाडीच्या कार्यकर्त्या असून त्यांनी तालुक्यातील शिरसे ग्रामपंचायत मधील उपसरपंच म्हणून काम पाहिले आहे. तर एमजीएम रुग्णालयात रुग्णांना



नेवून तेथे वैद्यकीय सेवा देण्याचा प्रयत्न अनेक वर्षे करीत आहेत. त्यामुळे शिवसैनिक असलेल्या मनीषा दळवी यांना पुन्हा एकदा पक्षाकडून मोठी जबाबदारी देण्यात आली आहे.आमदार आणि शिवसेना उत्तर रायगड जिल्हा प्रमुख महेंद्र थोरवे यांच्या सूचनेनुसार शिवसेना वैद्यकीय कक्ष आणि मदत कक्षाचे कर्जत तालुका समन्वयक म्हणून मनीषा दळवी यांची निवड केली आहे. शिवसेना वैद्यकीय कक्षाच्या ठाणे येथील कार्यालयात कक्षप्रमुख रामहरी राऊत आणि सह कक्षप्रमुख द्यानेश्र्वर गुळधुंडे यांनी हे नियुक्ती पत्र मनीषा दळवी यांना सुपूर्द केले. तर आरोग्य क्षेत्रात मदतीसाठी पुढे असणारे आणि रुग्णसेवे साठी धावपळ करणारे कर्जत शहरातील कार्यकर्ते उदय शिंदे यांना शिवसेना वैद्यकीय आणि मदत कक्षाचे कर्जत शहर कक्ष प्रमुख बनविला आहे. दोन्ही पदाधिकाऱ्यांचे शिवसेना उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, महिला आघाडी जिल्हा संघटक रेखा ठाकरे, तालुकाप्रमुख संभाजी जगताप, मतदारसंघ संपर्कप्रमुख पंकज पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

## नमुंमपा शहरातील घनकचरा विल्हेवाटीकडे बारकाईने लक्ष

### प्रकल्पस्थळाची आयुक्तांकडून पाहणी



**नवी मुंबई : बातमीदार**

घनकचरा व्यवस्थापनातील कचऱ्याची विल्हेवाट हा एक अत्यंत महत्वाचा घटक असून तुर्भे एमआयडीसी परिसरातील नवी मुंबई महानगरपालिकेचा शास्त्रोक्त घनकचरा प्रक्रिया प्रकल्प हा देशातील एक उत्तम प्रकल्प म्हणून नावाजला जातो. स्वच्छता ही नियमीत करण्याची गोष्ट असून स्वच्छता प्रक्रियेत अधिकाधिक सुधारणा करणे गरजेचे आहे. या भूमिकेतून नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर शहर स्वच्छतेप्रमाणेच घनकचरा विल्हेवाटीकडेही बारकाईने लक्ष देत आहेत.

या अनुषंगाने आयुक्त राजेश नार्वेकर यांनी शहर अभियंता संजय देसाई व पर्यावरण विभागाचे अतिरिक्त शहर अभियंता शिरीष आरदवाड व संबधित अधिकाऱ्यांसह घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाला भेट देऊन पाहणी केली. नागरिकांकडून कचऱ्याचे निर्मितीच्याच ठिकाणी वर्गीकरण करण्यावर महानगरपालिकेच्या वतीने भर देण्यात येत आहे. हे नागरिकांकडून अपेक्षित करताना संकलित केलेला वर्गीकृत कचरा संकलन आणि वाहतुक करतेवेळी एकत्र होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. वर्गीकरण न करता येणारा कचरा प्रकल्पस्थळी आल्यावर वर्गीकरण करावा लागतो हे ध्यानात घेऊन नागरिकांनी आपल्या स्तरावर कचरा वर्गीकरण न केल्यामुळे प्रकल्पस्थळी आपल्या स्वच्छताकर्मींना तो वेगळा करावा लागतो हे ध्यानात घेऊन स्वच्छतामित्रांचे काम आपल्यामुळे वाढणार नाही याची दक्षता घ्यावी व आपल्या घरातच कचरा टाकताना तो ओला व सुका अशा वेगवेगळया डब्यात टाकावा व स्वच्छताकर्मींना त्यांच्या कामातून काही प्रमाणात दिलासा द्यावा असे आवाहन आयुक्तांनी पुन्हा केले. प्रकल्पस्थळी काम करीत असलेल्या कामगारांचे आरोग्य व त्यांच्या सुरक्षाविषयक बाबींकडेही लक्ष देण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या.'शून्य कचरा' उद्दिष्ट प्रत्यक्षात साकारण्यासाठी कमीतकमी कचरा प्रकल्पस्थळी येणे गरजेचे असून त्यादृष्टीने कचरा संकलनाचे विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीने परिमंडळनिहाय कचरा संकलन केंद्र सुरु करणेबाबत नियोजन करावे.

## श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते महाविद्यालयात ज्ञानाची गुढी



**पनवेल : प्रतिनिधी**

गुढीपाडव्याला घरोघरी दरवर्षी पारंपारिक गुढी उभारून मराठी वर्षाचे स्वागत केले जाते. आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलितनवीन पनवेलमधील श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते महाविद्यालयात गुढीपाडव्याच्या शुभमुहर्तावर विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी यासाठी ज्ञानाची गुढी उभारण्यात आली होती. या माध्यमातून त्यांना पुस्तकांचे महत्त्व सांगून आजच्या मोबाईलच्या काळात पुन्हा एकदा त्याना वाचक बनविण्याचा प्रयत्न केला गेला.

या वेळी प्राचार्या डॉ. सीमा कांबळे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या कार्याची महती गात विद्यार्थी जीवनातील ज्ञानाच्या गुढीचे महत्व विशद केले व सर्वांना एक नवी दिशा दाखवली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रंथपाल प्रिया सागरे, सहाय्यक ग्रंथपाल निलम कदम, ग्रंथालय सदस्य प्रा.विनायक लोहार, प्रा.नेहा म्हात्रे, प्रा.अमिना शेख, सौ.परिमला कारंजकर, योगेश ठोकळ आणि संजय सुरवाडे या सर्वांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला.

संकट नैसर्गिक असो किंवा मानवनिर्मित असो त्याला एकजूटीने लढा देण्याची मानवी वृत्ती असते. ज्ञानामुळे माणूस अन् समाज समृध्द होतो. ज्ञानप्राप्तीची साधनं पुस्तक असतात. याच पुस्तकाच्या सहाय्याने अनेक अशक्य गोष्टी शक्य करता येतात. पुस्तकांची गुढी नवीन वर्षात सर्वांना वाचनाची प्रेरणा देत राहील, असे प्राचार्या डॉ. सीमा कांबळे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले.


**ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी**

**मु.तांबाटी, पो. डोणवत, ता. खालापुर, जि. रायगड**

जावक क्र. २४८ दि. २४/०३/२०२३

**निविदा**

वरील उपरोक्त विषयान्वये आपणास विनंतीपुर्वक कळविण्यात येत आहेकी, ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी मधुन खालील कामे करण्याबाबत ग्रामपंचायत तांबाटी मासिक सभेने मुजरी दीलेली असुन सदरची कामे आपल्या दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करावे ही आपणास विनंती या कामी होणारी फी भरण्यास ग्रामपंचायत तयार आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | निधी | अंदाजपत्रकीय रक्कम रूपये | ईसारा रक्कम | निविदा फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे वनवठे स्मशानभुमी जवळ निवारा शेड बांधकाम करणे. | ग्रामनिधी सन २०२२/२३ | ५०००००/- | ५०००/- | १००/- | ६ महिने |
| २ | वनवठे येथे आर ओ प्लांन्ट ला सोलर बसविणे. | ग्रामनिधी सन २०२२/२३ | ९९९४६०/- | ९९९४/- | १००/- | ६ महिने |
| ३ | मौजे वनवठे येथे गणपती घाट तयार करणे. | ग्रामनिधी सन २०२२/२३ | ५०००००/- | ५०००/- | १००/- | ६ महिने |
| ४ | मौजे वनवठे येथे गणपती घाट सुशोभिकरण करणे. | ग्रामनिधी सन २०२२/२३ | ५०००००/- | ५०००/- | १००/- | ६ महिने |
| ५ | मौजे वनवठे गावदेव मंदीराकडे जाणारा रस्ता तयार करणे. | ग्रामनिधी सन २०२२/२३ | ३०००००/- | ३०००/- | १००/- | ६ महिने |
| ६ | मौजे वनवठे अंतर्गत रस्ता तयार करणे. | ग्रामनिधी सन २०२२/२३ | ८०००००/- | ८०००/- | १००/- | ६ महिने |
| ७ | मौजे वनवठे सामाजिक सभागृह बांधकाम करणे. | ग्रामनिधी सन २०२२/२३ | १००००००/- | १००००/- | १००/- | ६ महिने |

**अटी व शर्ती :-**

१. सदर कामाच्या पुर्ण भरलेल्या निविदा दि २५/३/२०२३ ते दि. ३१/०३/२०२३ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळुन सकाळी १० ते ५ पर्यंत कोटेशन ग्रामपंचायत कार्यालयात जमा कराव्यात. आलेल्या निविदा दि. ०१/०४/२०२३ च्या मासिक सभेत फोडण्यात येईल.
२. प्राप्त निविदा ग्रामपंचायत कार्यालयात हजर निविदा धारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष दिनांक ०१/०४/२०२३ पर्यंत दुपारी ठीक १२.०० वाजता उघडण्यात येतील.
३. आलेल्या निविदापैकी कोणतीही एक निविदा स्वीकारण्याची अथवा आलेल्या सर्व कोटेशन नाकारण्याचे सर्वस्व अधिकार ग्रामपंचायत तांबाटीने राखुन ठेवलेला आहे.
४. निविदा बंद लखोट्यात असावे.
५. कामाचा अनुभव असणा-या ठेकेदारास प्राधान्य दिले जाईल.
६. नोदणीकृत व जी.एस.टी. धारक परवाना धारक टेकेदारास प्राधान्य देण्यात येईल.
७. पोस्टाने निविदा स्विकारल्या जाणार नाही.
८. अ.क्र.२ बावात सोलर बाबत अनुभव लायसन्स धारक असलेल्या ठेकेदारास प्राधान्य देण्यात येईल.
९. अटी व शर्ती घालुन सादर केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
१०. पुरेशी स्पर्धा न झाल्यास प्रक्रिया रद्द करुन फेर प्रक्रिया करण्यात येईल.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी**

# भाजपकडून राहुल गांधींचा निषेध

## ओबीसींचा अपमान केल्याने खारघर व कामोठ्यात घोषणाबाजी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मोदी आडनावावरून बेताल वक्तव्य केल्याबद्दल भारतीय जनता पक्षातर्फे खारघर आणि कामोठे येथे काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा शुक्रवारी (दि. २४) निषेध करण्यात आला.

२०१९च्या लोकसभा निवडणुकीच्या कर्नाटकमधील प्रचार दौऱ्यात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी देशाच्या विकासाबद्दल किंवा नागरिकांच्या भल्याचे विधान करण्याऐवजी सर्व चोरांचे नाव मोदी कसे? अशी टीका भर सभेत केली होती. याविरोधात सुरत न्यायालयाने त्यांना दोषी ठरवून दोन वर्षाची शिक्षा सुनावली. अशा बेताल वक्तव्यामुळे राहुल गांधी आणि काँग्रेसचा खरा चेहरा समोर आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तेली समाजातून येतात. तेली समाज हा ओबीसींमधला मोठा घटक आहे. पंतप्रधान मोदींसारख्या नेतृत्वाला जातीवाचक शिव्या देणे हा गुन्हा असून कोर्टाने त्यांना शिक्षा सुनावली आहे. त्या अंतर्गत शुक्रवारी खारघर येथील भाजप मध्यवर्ती कार्यालय तसेच कामोठे येथे राहुल गांधी यांच्या वक्तव्याचा निषेध करण्यात आला.

या वेळी कामोठे येथे भाजपचे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, पनवेल महापालिकेचे माजी नगरसेक विजय चिपळेकर, विकास घरत, उत्तर रायगड ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, कामोठे शहर युवा अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, सरचिटणीस सुशील शर्मा, भटके विमुक्त सेलच्या जिल्हा महिला प्रमुख विद्या तामखेडे, कामोठे महिला मोर्चा अध्यक्षा वनिता पाटील, तर खारघर येथे भाजपचे खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, प्रवीण पाटील, नरेश ठाकूर, ओबीसी मोर्चा खारघर मंडल अध्यक्ष सुरेश ठाकूर, उपाध्यक्ष संजय घरत, उपाध्यक्षा बिना गोगरी, सरचिटणीस साधना पवार, युवा मोर्चा सरचिटणीस अमर उपाध्याय, उत्तर भारतीय मोर्चा संयोजक विनोद ठाकूर, शिक्षक सेलचे संदीप रेड्डी, प्रभाकर बांगर, पप्पू खामकर, सुस्मित डोळस, क्षमा राव, प्रवीण बेरा, योगेश पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पनवेलमध्ये मालमत्ता कर वसुलीत भरघोस वाढ

## नागरिकांचा कर भरण्याकडे कल वाढला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून महानगरपालिकेने सिडको हस्तांतरीत भाग, एमआयडीसी भागांमध्ये व्यावसायिक मालमत्ता करधारकांडून वसुलीची थेट कारवाई सुरू केली आहे. परिणामी मालमत्ता करांमध्ये भरघोस वाढ होताना दिसत आहे. आत्तापर्यंत एकूण मालमत्ता कर २२० कोटी जमा झाला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था जसे महानगरपालिका महत्त्वाच्या सेवा नागरिकांना पुरवित असते. यामध्ये पाणी पुरवठा, रस्ते, त्यांची देखभाल, ड्रेनेज, परिसराची स्वच्छता, उद्याने, विविध नागरी सुविधा दिल्या जातात. मालमत्ता कर महानगरपालिकेला सर्व सेवा देण्यासाठी महसूल मिळवून देत असतो. महापालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत हा मालमत्ता कर असतो, तसेच कायद्यानेही मालमत्ता कर भरणे बंधनकारक आहे. येत्या काळामध्ये महापालिकेने अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आहेत. विविध विकास कामांमध्ये नऊ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र, समाज मंदिरे, स्मार्ट व्हिलेज अंतर्गत कोयनावळे, करवले,धानसर, रोडपाली, बौद्धवाडा येथील पायाभूत सुविधांची कामे आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जलद गतीने पूर्ण होत आहेत.

प्रस्तावित कामांमध्ये पायाभूत सुविधांमध्ये नागरीकांच्या आरोग्याचा दर्जा उंचावण्यासाठी ४५० खाटांचे सुसज्ज माता व बालसंगोपन रुग्णालय हिरकणी या नावाने प्रस्तावित करण्यात आलेले आहे. नवीन मुख्यालय बांधणे, एलईडी पथदिवे बसविणे, तळोजे, पाचनंद येथील तलाव परिसराचे सुशोभिकरणाचे काम सुरू आहे. याचबरोबर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बहुउद्देशिय सभागृह बांधण्यात येणार आहे.

या सर्व प्रस्तावित कामांसाठी मालमत्ता कर हा प्रमुख स्त्रोत असणार आहे, तसेच न्यायालयानेही मालमत्ता कर वसुलीला स्थगिती दिली नाही. त्यामुळे नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरून महापालिकेच्या विकासाचे भागीदार बनण्याचे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी 'पीएमसी टॅक्स ॲप' विकसित केले आहे, तसेच www.panvelmc.org या वेबसाईटवर जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे.



# राष्ट्रभाषा परीक्षेत सीकेटी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे सुयश




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखिल भारतीय राष्ट्रभाषा विकास समितीतर्फे इ. पाचवी ते दहावीसाठी राष्ट्रभाषा परिचय परीक्षा प्रवेशिका परीक्षा प्रथम परीक्षा, द्वितीय परीक्षा, तृतीय परीक्षा, चौथी परीक्षा, सुलेखन परीक्षा तसेच निबंध लेखन परीक्षेचे आयोजन २२ डिसेंबर २०२२ रोजी करण्यात आले होते. या परीक्षेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी विद्यालयाचे एकूण १९८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यात १०८ प्रथम, ५२ द्वितीय, ३४ तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

या परीक्षेत हर्षल किशोर बोरसे इ. सातवी, अमीन मुस्ताक अन्सारी इ. आठवी, जानवी प्रल्हाद डाके इ. नववी, आर्या सुधीर पाटील इ. दहावी या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय भाषारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

या परीक्षेच्या उत्तम नियोजनामुळे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांना प्रधानाचार्य पुरस्कार व सहाय्यक शिक्षिका शशिकला पाटील यांना आदर्श अध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, सहसचिव भाऊसाहेब थोरात, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, परिवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले.

# खारघरमध्ये प्राणप्रतिष्ठा सोहळा; भाजप नेते परेश ठाकूर यांनी घेतले दर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील श्री साई गणेश मंदिर ट्रस्टच्या वतीने वतीने श्री गणपती बाप्पा व साईबाबा यांच्या मूर्तीची तसेच श्री स्वामी समर्थ यांच्या फोटो व पादुकांचा प्राणप्रतिष्ठा सोहळा आयोजित केला होता, तसेच गुढीपाडव्याच्या निमित्ताने आणि स्वामी प्रकट दिनाचे औचित्य साधून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गुरुवारी (दि. २३) मनोभावे दर्शन घेतले.

या वेळी कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजपचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, सदस्य प्रशांत कदम, खारघर तळोजा मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, माजी नगरसेविका संजना कदम, नेत्रा पाटील, शहर सरचिटणीस कीर्ती नवघरे, युवा नेते अमर उपाध्याय, समीर कदम, किरण पाटील, बिना गोगरी, मुकेश गर्ग, राजेंद्र अग्रवाल आदी उपस्थित होते.



# पनवेल-सायन महामार्गावर ट्रक उलटला; वाहतूक विस्कळीत



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील ठाणा नाका येथील ब्रिजवर ट्रक उलटल्याची घटना शुक्रवारी (दि. २४) पहाटे घडली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र काही काळ वाहतूक विस्कळीत झाली.

ठाणा नाका येथील ब्रिजवर या ट्रकवरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि तो उलटला. सुदैवाने या वेळी ब्रिजवर वाहतूक कमी होती. पहाटे ट्रक उलटल्याने वाहतूक कोंडी कमी होती, मात्र याची माहिती वाहतूक पोलिसांना तत्काळ देण्यात आली.

पोलिसांनी एका बाजूने वाहतूक सुरू केली व काही वेळानंतर हा ट्रकही तेथून बाजूला काढण्यात आला. सुदैवाने यात कोणीही जखमी झाले नाही, मात्र ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.




**कळंबाली : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी ओबीसी समाजाबाबत केलेल्या बेताल वक्तव्याचा कळंबोली मंडलातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शुक्रवारी निषेध केला. या वेळी ओबीसी सेल उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, कळंबोली शहर मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, राजेंद्र शर्मा, कळंबोली ओबीसी सेल अध्यक्ष जनार्दन पाटील, उत्तर जिल्हा सचिव रमेश नायर, संदीप भगत, रामा महानवर, केशव यादव, प्रकाश शेलार, मच्छिंद्र कुरुंद, दत्ता भिसे, कल्पेश मोहिते, राजन पिल्ले, जगदिश खंडेलवाल, कळंबोली महिला सरचिटणीस दुर्गा सहानी, उमा राव, निता अधिकारी, श्वेता नगराळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.**

# सीकेटी महाविद्यालयात संशोधन कार्यप्रणालीवर कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाने संशोधन कार्यप्रणाली कार्यशाळेचे आयोजन मंगळवारी (दि. २१) करण्यात आले.





या वेळी पाहुणे म्हणून के. जे. सोमय्या महाविद्यालयाचे रसायनशास्त्र विभागाचे सहाय्यक प्रा. नानाभाऊ करंजुले, विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. बी. व्ही. जाधव आणि इतर प्राध्यापकांनी उपस्थिती दर्शविली. कार्यशाळेच्या दिवशी डॉ. बी. व्ही. जाधव यांनी कार्यशाळेची आणि रसायनशास्त्र विभागाच्या प्रोफाईलची माहिती दिली. त्याचबरोबर प्रा. डी. के. पाटील यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. नानाभाऊ करंजुले यांनी साहित्य समीक्षा, संशोधन नैतिकता, संदर्भ साहित्य, केमड्रॉचा वापर, नेट-सेट परीक्षा अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेचे सूत्रसंचालन रसायनशास्त्र विभागाचे प्रा. आर. एन. पाटील याने केले, तसेच रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थी राहुल गुप्ता याने आभार मानले. कार्यशाळा यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकुर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के पाटील यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# विकासाकडे झेपावणारं पनवेल अन् आमचाही सहभाग



**-संपदा राजेश देशपांडे**
कवियत्री आणि लेखिका

जर २००४ साली कोणी मला म्हटले असते की, तू पनवेलकर होणारेस तर मला ते कधीही पटले नसते. २००३ला लग्न होऊन महाडला गेले. तिथल्या शांतपणाची सवय झाली होती. अचानक २००८मध्ये मिस्टरांनी नोकरी बदलली आणि पनवेलला यायचा योग आला. माझे माहेर कर्जत तिथून जवळच असल्यामुळे खूप वेळा पनवेलला येणे झाले होते. पनवेल तक्का येथे गोदरेज स्काय गार्डन नावाच्या सोसायटीत रहायला गेलो. त्या भागात एकीकडे जुना कोळ्यांचा गाव, तर दुसरीकडे मोठ्या इमारती एक वेगळेच कॉम्बिनेशन वाटायचे. इतक्या इमारती असूनही तिकडे फार दुकाने नव्हती. त्यामुळे आठवड्यातून एकदा पनवेलमध्ये येऊन सगळे सामान घेऊन जायचो.

शिक्षणाच्या दृष्टीने पनवेल हे अगदी आदर्श ठिकाण वाटले. मुलाला रायन इंटरनॅशनल स्कूलमध्ये ॲडमिशन मिळाले. त्यामुळे पहिल्यांदाच पनवेलमध्ये आल्याचा आनंद वाटला. पनवेलची खरी ओळख पटली जेव्हा आम्ही तक्का सोडून मुख्य पनवेलमध्ये फ्लॅट घेतला तेव्हा. आम्ही पनवेलच्या अगदी मध्यावर म्हणजे लाईन आळीमध्ये रहायला आलो. गावात येण्याचे फायदे अनेक होते तसेच तोटेही होते. गावात आल्यावर उन्हाळ्यात पाणी ठराविक वेळच येत असे. लवकर उठून धावपळ करीत पाण्याची साठवण करायला लागायची. ती परिस्थिती आता बदलली गेली पाहिजे. आम्ही स्वतःचे घर घेतले तेव्हा पनवेलमध्ये अनेक बांधकामे सुरू होती. जुने वाडे पाडून त्या जागी नवीन इमारती उभारल्या जात होत्या. डोळ्यांसमोर पनवेल बदलताना दिसत होते. विचार मनात येतो की, पालिका मोठ मोठ्या इमारती बांधायला परवानगी देते, परंतु इतक्या लोकांना पुरण्याइतक्या पाण्याचा साठा आपल्याकडे उपलब्ध आहे का? याचा विचार करीत नाही. आपण सुधारणेच्या दिशेने एक पाऊल पुढे जात आहोत याचा आनंद आहेच, पण आज नवीन इमारत दिसली की काळजी वाटते, आता दिवसातून अर्धा तास तरी पाणी येतं तेही बंद होईल का?

पनवेलमध्ये येणारी अजून एक समस्या म्हणजे पॉवरकट. दिवसातून अनेक वेळा लाईट जातात. कामाच्या वेळात गोंधळ होतो. यावर काहीतरी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. पनवेल बाजारपेठेत येणारी सगळ्यात मोठी समस्या म्हणजे ट्रॅफिक जॅम. वाहने ठेवण्यासाठी प्रायव्हेट पार्किंग किंवा सार्वजनिक वाहनतळांची कमतरता जाणवते. बाजारपेठेत असणाऱ्या इमारतींमधील लोक आपली वाहने रस्त्यावर पार्क करतात. याबाबत विचार करणे गरजेचे आहे.

पनवेलमध्ये राहण्याचा सगळ्यात मोठा फायदा म्हणजे हे मध्यवर्ती शहर आहे. मुंबई, नवी मुंबई, पुणे, अलिबाग, कोकण येथे पनवेलहून सहजपणे जाता येते. सर्वसामान्यांना परवडेल असे सर्व सोयींयुक्त असे सुसज्ज शासकीय हॉस्पिटल पनवेलमध्ये व्हायला हवे. आज पनवेलमध्ये अनेक हॉस्पिटल्स असली तरी जिथे सर्व सोयी उपलब्ध आहेत ती खासगी आहेत, जी सामान्य किंवा गरीबजनांना परवडणे कठीण आहे. त्या दृष्टीने विचार करायला हवा. झोपडपट्ट्यांचे प्रमाणही वाढत आहे. हे लोक बेकायदेशीरपणे पाणी, वीज वापरतात. त्यामुळे सामान्य लोकांना जे वेळच्या वेळी सर्व कर भरतात तरीही त्यांचे वीज आणि पाणी या दोन्ही बाबतीत हाल होतात.

शासनाने सुधारणांच्या दिशेने आपले पाऊल उचलले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक हा पनवेलचा मोठा लँडमार्क जो आजही तसाच आहे. उलट पूर्वीपेक्षा अधिक सुंदर आणि सुशोभित करण्यात आला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडेकरांचा पुतळा, अशा अनेक खुणा महापालिकेने अतिशय सुंदर सजावटीने खुलवल्या आहेत. पनवेल शहरात बस डेपोजवळून होणाऱ्या ट्रॅफिकची समस्या लक्षात घेऊन फ्लायओव्हर बांधला. पनवेलमध्ये कुठे जायचे असेल तर रिक्षाशिवाय पर्याय नव्हता, पण आता काही भागात नवी मुंबई महापालिकेची बस सुरू झाली आहे. अनेक ठिकाणे पेंटिंग्स करून सुशोभित करण्यात आली आहेत. हळूहळू पनवेल कात टाकत आहे आणि नवे सुंदर स्वरूप धारण करीत आहे.

पनवेलकर म्हणून प्रत्येक नागरिकाने आपले शहर म्हणजे आपले घर समजून विचार करायला हवा. सुरुवात आपण आपल्या घरापासून करायला हवी. त्यासाठी सोसायट्यांनी एकत्र येऊन स्वछता मोहीम आखली पाहिजे. पाण्याचा प्रश्न टाळण्यासाठी प्रत्येक सोसायटीने पावसाचे पाणी साठवून कसे वापरता येईल याचा विचार करून त्या दृष्टीने पावले उचलायला हवीत. वीज, पाणी, गॅस यांचा अपव्यय टाळायला हवा. जेव्हा शक्य असेल तेव्हा सार्वजनिक वाहनाने प्रवास करावा. जर आपण स्वतःला शिस्त लावून घेतली तरच आपण इतरांना बदलू शकतो. शेवटी कालाय तस्मै नमः या प्रमाणे सुधारणांना वेळ लागणारच, पण त्या होणार. वाट पाहणे आणि या सुधारणा होण्यासाठी आपला खारीचा वाटा उचलणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

## संपादकीय

# संसर्गावर सज्ञता

राज्यात पुन्हा एकदा कोरोना डोके वर काढत असतानाच एच३एन२ या एन्फ्लूएंझाच्या विषाणूचाही संसर्ग वाढत आहे. म्हणूनच सर्दी, खोकल्यासह तापाच्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर दिसून येते. याबाबत चिंता करण्याची गरज नसली तरी काळजी घेणे निश्चितपणे जरुरी आहे. म्हणूनच सरकारी पातळीवर सातत्याने जनजागृती करून सर्तकतेचे आवाहन करण्यात येत आहे.

**आज तीन वर्षे होत आली तरी कोरोना नावाचे संकट मानवापासून दूर जाण्याचे नाव घेत नाही. एव्हाना त्याचा प्रकोप कमी झाला असला तरी समूळ उच्चाटन झालेले नाही. तो नवनव्या उत्परिवर्तित (व्हेरिएंट)च्या रूपात आपले जाळे पसरवत असतो. आताही कोरोनाच्या एक्सबीबी.१.१६ या नव्या व्हेरिएंटमुळे रुग्णवाढ होत असल्याचे वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे. सुदैवाने या प्रकाराची तीव्रता कमी असल्याने रुग्ण दगाविण्याची शक्यता कमी आहे, पण एखाद्याला सौम्य आजार असल्यास त्यांची प्रतिकारक्षमता काही प्रमाणात वाढू शकते. आणखी एक बाब कोरोनावाढीसाठी कारणीभूत ठरल्याचे निरीक्षण तज्ज्ञांनी मांडले आहे. त्यांच्या मतानुसार कोविड विषाणू प्रतिबंधक लस मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून दिली गेली असली तरी अनेक लाभार्थी दुसऱ्या तसेच बूस्टर डोसपासून वंचित आहेत. त्यामुळे प्रतिपिंड (अँटिबॉडी) कमी होऊन संसर्ग वाढ होत आहे. एकीकडे कोरोना रुग्णसंख्या वधारत असताना त्याचवेळी एच३एन२ हा एन्फ्लूएंझाचा विषाणू वेगाने पसरत आहे. कालच या विषाणूमुळे ठाण्यात पहिल्या बळीची नोंद झाली. तत्पूर्वीच सरकारी पातळीवर वाढत्या संसर्गाची दखल घेत उपाययोजनांवर खल सुरू आहे. नुकतीच स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उच्चस्तरीय आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी सार्वजनिक आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्याचे आदेश दिले तसेच नागरिकांनीही योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन केले. या वेळी केंद्रीय आरोग्य सचिव राजेश भूषण यांनी कोरोनाची जागतिक स्थिती आणि आपल्या देशातील रुग्णसंख्येबाबत माहिती दिली. यापूर्वीच्या आढावा बैठकीचा कृती अहवालही या वेळी सादर करण्यात आला. कोरोनासह तापावरील औषधांच्या साठ्याबाबतही आढावा घेण्यात आला. यानंतर पंतप्रधान मोदींनी विविध सूचना देत सार्वजनिक आरोग्य यंत्रणांना सज्ज राहण्याचे आदेश दिले. यात त्यांनी प्रामुख्याने देशभरातील प्रयोगशाळांमध्ये जनुकीय क्रमनिर्धारण (जिनोम सिक्वेन्सिंग)चे प्रमाण वाढवावे, जेणेकरून कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटची माहिती वेळेत मिळून योग्य ती कार्यवाही करता येईल, अशी मुख्य सूचना केली. याशिवाय साथ पसरू नये यासाठी योग्य काळजी घ्या आणि कोरोना लसीकरणावर भर द्या हे सांगण्यासही पंतप्रधान विसरले नाहीत. महाराष्ट्रातही वाढती रुग्णसंख्या लक्षात घेता दक्षता घेण्यात येत आहे. या संदर्भात राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी विधानसभा व विधान परिषदेत निवेदनाद्वारे माहिती दिली. ते म्हणाले की, आरोग्याच्या सर्व संस्थांना सर्वेक्षण वाढविण्याच्या आणि उपचाराबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. मुख्यमंत्र्यांनीदेखील आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाचा आढावा घेऊन केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनानुसार कार्यवाहीच्या सूचना दिलेल्या आहेत. एकूणच आताच्या घडीला कोरोना व एन्फ्लूएंझाचा धोका नसला तरी सरकारी पातळीवर आवश्यक ती पावले उचलण्यात येत आहेत. नागरिकांनीही स्वत:ची काळजी घेणे गरजेचे व सर्वांच्याच हिताचे ठरेल.**

# प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराचे मानकरी

गेट वे ऑफ इंडिया येथे आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान कार्यक्रमात २०२१ रोजीचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार पद्मविभूषण आशा भोसले यांना शुक्रवारी प्रदान करण्यात आला. आतापर्यंत १९ जणांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. २५ लाख रुपये रोख, मानपत्र, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे, तर मग जाणून घेऊया कोण आहेत महाराष्ट्राचे 'महाराष्ट्र भूषण'...

**१. पु. ल. देशपांडे** : साहित्यक्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल १९९७ साली पहिला महाराष्ट्र भूषण पुरस्कार पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे यांना प्रदान केला. मराठी लेखक, नाटककार, नट, कथा आणि पटकथाकार, दिग्दर्शक आणि संगीत दिग्दर्शक म्हणून त्यांची ख्याती होती.

**२. लता मंगेशकर** : आपल्या सर्वांना परिचित असलेल्या दीदी आणि भारतीय चित्रपट संगीताला अतिशय वरच्या दर्जावर नेण्याचे काम लता मंगेशकर यांच्या असामान्य आवाजाने केले. संगीत क्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल १९९८मध्ये लता दीनानाथ मंगेशकर यांना महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार दैऊन गौरव केला. केंद्र सरकारनेही २००१साली लता मंगेशकर यांचा भारतरत्न देऊन सन्मान केला आहे.

**३. डॉ. विजय भटकर** : परम महासंगणकाचे जनक अशी ओळख असलेले डॉ. विजय पांडुरंग भटकर यांनी माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात जागतिक कीर्ती मिळविली. भारतातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना पद्मश्री हा सर्वोच्च नागरी सन्मान २०००मध्ये तत्पूर्वी सन १९९९मध्ये महाराष्ट्र भूषण हा सन्मानही प्रदान करण्यात आला आहे.

**४. सुनील गावस्कर** : सुनील मनोहर गावसकर यांना आपण ओळखतो ते भारताचा महान क्रिकेटर म्हणून. कसोटी सामन्यांच्या रणांगणात दहा हजार रन्सचा पल्ला ओलांडणारा पहिला फलंदाज. सन २०००मध्ये सुनील गावस्कर यांना महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

**५. सचिन तेंडुलकर** : गेली जवळपास अडीच दशके भारतासह जगातील कोट्यवधी क्रिकेट रसिकांना आपल्या खेळाने परमानंद देणाऱ्या सचिन रमेश तेंडुलकर यांना क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल राज्य शासनाचा सन २००१चा महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार देण्यात आला. २०१४मध्ये सचिन रमेश तेंडुलकर यांना 'भारतरत्न' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

**६. पं. भीमसेन जोशी** : लहानपणापासूनच संगीताचा ओढा असलेल्या भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांना महाराष्ट्र शासनाने सन २००२मध्ये संगीत क्षेत्रात बहुमूल्य योगदान दिल्याबद्दल महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार दिला. ६० वर्षांहून अधिक काळ संगीतात योगदान देणाऱ्या पंडितजींनी त्यांच्या गुरुजींच्या नावाने सवाई गंधर्व महोत्सव सुरू केला. आज राज्य शासन पंडित भीमसेन जोशी यांच्या नावाने संगीत शिष्यवृत्ती देते. पं. भीमसेन जोशी यांना भारतरत्न या भारतातील सर्वोच्च नागरी पुरस्काराने २००८मध्ये गौरविण्यात आले आहे.

**७. डॉ. अभय बंग आणि डॉ. राणी बंग** : आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल डॉ. अभय बंग आणि राणी बंग यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेले आहे. समाजप्रबोधन या क्षेत्रात बहुमूल्य योगदान देण्यासाठी २००३ साली या दाम्पत्याला महाराष्ट्र भूषण या पुरस्काराने गौरविण्यात आले.




**८. डॉ. बाबा आमटे** : मुरलीधर देवीदास आमटे यांनी कुष्ठरोग्यांसाठी जीवन वेचण्याचा निर्णय घेऊन हा मुरलीधर लाखो कुष्ठरोग्यांना आपलासा वाटणारे 'बाबा' झाले. कुष्ठरोग्यांच्या सेवेचे व्रत अंगीकारले. २००४ साली महाराष्ट्र शासनाने समाज प्रबोधनासाठी डॉ. मुरलीधर आमटे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार दिला.

**९. डॉ. रघुनाथ माशेलकर** : भारतातील मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी बौद्धिक क्षमतेच्या आधारे ज्ञानाचे अर्थपूर्ण नियोजन करणारे डॉ. रघुनाथ माशेलकर हे भारतातील आघाडीचे शास्त्रज्ञ आहेत. २००५मध्ये महाराष्ट्र शासनाने डॉ. माशेलकर यांना महाराष्ट्रभूषण देऊन त्यांचा सन्मान केला.

**१०. रतन टाटा** : राज्याच्या विकासात टाटा समुहाचे मोठे योगदान आहे. टाटा समुहाचे मानद अध्यक्ष आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील आदरणीय व्यक्तिमत्त्व असलेल्या रतन टाटा यांना उद्योग क्षेत्रातील योगदान मोठे असून त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून २००६ साली महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार दिला.

**११. रामराव कृष्णराव पाटील** : भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी त्यांनी आयसीएस सेवेचा राजीनामा दिला होता. त्यानंतर त्यांनी मध्य प्रांतात आमदार म्हणून काम केले होते, तसेच विविध खात्यांचे मंत्री म्हणूनही त्यांनी काम केले. ऐतिहासिक नागपूर करारावर त्यांनी सही केली होती. त्यांचे वयाच्या ९९व्या वर्षी, ३१ मे, २००७ रोजी निधन झाले. त्यांना मृत्यूनंतर २००७मध्ये महाराष्ट्र भूषण देण्यात आला.

**१२. नानासाहेब धर्माधिकारी** : नारायण विष्णु धर्माधिकारी ऊर्फ नानासाहेब धर्माधिकारी हे समर्थ रामदासांच्या दासबोधाचे निरूपणकार होते. त्यांनी आयुष्यभर अध्यात्म, शिक्षण, आरोग्य, समाजप्रबोधन व व्यसनमुक्ती क्षेत्रांत निरलसपणे कार्य केले. नानासाहेब धर्माधिकारी यांचे जगभरात लाखो अनुयायी आहेत. समाजप्रबोधनासाठी २००८ साली महाराष्ट्र शासनातर्फे धर्माधिकारी यांना मरणोत्तर महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले.

**१३. मंगेश पाडगावकर** : मंगेश केशव पाडगांवकर यांना २००८ साली महाराष्ट्र शासनाने साहित्य क्षेत्रात भरीव योगदान दिल्याबद्दल महाराष्ट्र भूषण पुरस्कार दिला. मंगेश पाडगावकर यांनी लिहिलेली प्रेम म्हणजे प्रेम असतं ही कविता खूप गाजली.

**१४. सुलोचना लाटकर** : मराठी–हिंदी सिनेमांतून सोज्वळ भूमिका रंगवणाऱ्या अभिनेत्री सुलोचना यांचा चेहरा आजही प्रेक्षक विसरलेले नाहीत. ६५हून अधिक वर्षांच्या कारकिर्दीत कलाकार–दिग्दर्शक–तंत्रज्ञांच्या अनेक पिढ्यांबरोबर त्यांनी काम केले आहे. मराठी चित्रपटात बहुमूल्य योगदान देणाऱ्या सुलोचना लाटकर यांना २००९मध्ये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रभूषण हा पुरस्कार दिला.

**१५. डॉ. जयंत नारळीकर** : जागतिक किर्तीचे शास्त्रज्ञ, 'विज्ञाननिष्ठा' हे मूल्य भारतात रूजवण्याचा सातत्याने प्रयत्न करणारे विज्ञान–प्रसारक आणि अभिमानाने मराठीत लेखन करणारे ज्येष्ठ वैज्ञानिक–लेखक अशी डॉ. जयंत नारळीकर यांची ओळख आहे. विज्ञानातील सिद्धांत आपल्या लेखणीतून, व्याख्यानातून त्यांनी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविले. मराठी विज्ञानकथेचे ते प्रणेते आहेत. २०१०मध्ये त्यांना महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार दिला.

**१६. डॉ. अनिल काकोडकर** : बदलत्या भारताची वेगाने वाढणाऱ्या ऊर्जेची गरज अणुशक्तीच पुरी करू शकेल, असा दृढ विश्वास असणाऱ्या डॉ. अनिल काकोडकर यांना भारताच्या अणु–कार्यक्रमाचे आघाडीचे शिलेदार मानले जाते. भारताच्या अणुशक्ती आयोगाचे दहा वर्षांहून अधिक काळ डॉ. काकोडकर अध्यक्ष होते. २०११मध्ये डॉ. काकोडकर यांना महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार देण्यात आला.

**१७. बाबासाहेब पुरंदरे** : बळवंत मोरेश्वर ऊर्फ बाबासाहेब पुरंदरे हे मराठी साहित्यिक, नाटककार, इतिहासकार आणि वक्ते आहेत. शिवचरित्र हे घरोघरी पोहचावे हे ध्येय ठेवून बाबासाहेबांनी अथक संशोधनातून व परिश्रमांतून राजा शिवछत्रपती हा ग्रंथ साकार केला. छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास सर्वसामान्यांपुढे 'जाणता राजा'च्या माध्यमातून नेण्याचे काम शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी केले आहे. २०१५ मध्ये साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी बाबासाहेब पुरंदरे यांना महाराष्ट्रभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

**१८. आशा भोसले** : आशा भोसले यांनी चित्रपट गायनाची सुरुवात 'माझा बाळ' या चित्रपटातून केली. आपल्या सुमधूर स्वरांनी संगीत क्षेत्रात चौफेर कामगिरी आणि गेली सात दशके रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविले. बॉलीवूडध्ये तब्बल १००० पेक्षा जास्त चित्रपटांमध्ये त्यांनी प्ले–बॅक सिंगर म्हणून आवाज दिला आहे. बॉलीवूडमध्ये आशाताईंना 'मेलडी क्वीन' म्हणून ओळखले जाते. आशाताईंनी आत्तापर्यंत ११,००० पेक्षा जास्त गाणी गायली असून आतापर्यंत त्यांनी २०पेक्षा जास्त भाषांमध्ये गाणी गायली आहेत. २०२१ या वर्षीचा पुरस्कार आशा भोसले यांना जाहीर झाला आहे.

**१९. डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी** : आप्पासाहेब धर्माधिकारी हे महाराष्ट्रातील समाजसेवक आहेत. नाना धर्माधिकारींच्या पावलावर पाऊल टाकत महाराष्ट्रात अनेक वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, निशुल्क वैद्यकीय शिबीर, रोजगार मेळावे, स्वच्छता मोहीम, अंधश्रद्धा निर्मुलन, व्यसनमुक्ती केंद्र आदी कार्यक्रमांचे आयोजन करतात. २०१४मध्ये डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, नेरूळने त्यांना विद्यालंकार ही मानद पदवी बहाल केली. २०१७मध्ये ते चौथ्या पद्मश्रीने सन्मानित झाले. सन २०२२ या वर्षीचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला.

**–वर्षा फडके–आंधळे, विभागीय संपर्क अधिकारी (सांस्कृतिक कार्य)**



## बदलते तंत्रज्ञान

# सेलमध्ये खरेदी केलेला नवा स्मार्टफोन असू शकतो बनावटी




ऑनलाइन ई–कॉमर्स वेबसाईट्स दरदिवशी नवनवीन सेलचे ऑफर आणत असतात. या सेलमध्ये काही बंपर ऑफर्ससुद्धा असतात ज्यात भरपूर प्रमाणार डिस्काउंटसुद्धा असते. त्यामुळे अनेक लोकांना ऑनलाईन शॉपिंग करायला आवडते.

स्मार्टफोनवरही बरेच ऑफर आणि सेल असतात. विशेष ऑफरच्या सेलमध्ये असलेले स्मार्टफोन्सही अनेकजण खरेदी करतात, पण कधी तुमच्या मनात हा विचार आला की, जो फोन तुम्ही सेलमध्ये खरेदी करीत आहात तो बनावटी असेल तर... जर तुमच्या मनात अशा प्रकारची शंका निर्माण झाली तर तुम्ही सोप्या पद्धतीने स्मार्टफोन बनावटी आहे की नाही, हे चेक करू शकता.

एसएमएस पाठवून करा चेक : डिपार्टमेंट ऑफ टेलीकम्युनिकेशनने एक अशी सुविधा दिली आहे की, ज्याद्वारे तुम्ही एसएमएस पाठवून फोनविषयी डिटेल्स जाणून घेऊ शकता. याशिवाय तुम्ही सी–डॉट अ‍ॅपद्वारे तुमचा फोन बनावटी आहे की नाही, हेसुद्धा चेक करू शकता.

मॅसेजद्वारे जाणून घेण्यासाठी १४४२२ नंबरवर एक मॅसेज पाठवा. मॅसेज KYM² स्पेस तुमच्या फोनचा १५ अंकांचा आयएमईआय नंबर या मेसेजवर पाठवा. तुम्हाला फोनची सर्व डिटेल्स मिळून जाणार.

कसा जाणून घ्यायचा आयएमईआय नंबर : आयएमईआय नंबर जाणून घेणे, खूप सोपे आहे. तुम्हाला तुमच्या फोनमध्ये *०६ डायल करा. हे डायल केल्यानंतर तुमच्या फोनच्या स्क्रीनवर एक मॅसेज येणार ज्यामध्ये खचएख नंबर असेल.

याशिवाय एक असा अ‍ॅप ही आहे. ज्याद्वारे तुम्ही आपल्या फोनची डिटेल्स जाणून घेऊ शकता. KYM² - Know Your Mobile अ‍ॅप हा फ्रीमध्ये डाउनलोड करा. हा अ‍ॅप तुम्ही प्ले स्टोर किंवा गूगल प्ले स्टोरवरुनही डाउनलोड करू शकता. हे अ‍ॅप सी–डॉटने स्वत: तयार केला आहे.

# प्रसिद्ध लेखक, कथाकार व. पु. काळे



## निमित्त

वसंत पुरुषोत्तम काळे हे मराठी भाषेतील लेखक होते. ते व. पु. काळे या नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांनी ६० पेक्षा जास्त पुस्तके लिहिली आहेत. पार्टनर, वपुर्झा, ही वाट एकटीची आणि ठिकरी ही पुस्तके विशेष प्रसिद्ध आहेत. ते प्रसिद्ध कथाकथनकार होते. त्यांचे १,६०० पेक्षा जास्त कथाकथनाचे कार्यक्रम झाले होते. ध्वनीमुद्रणाच्या माध्यमातून येणारे ते पहिले मराठी लेखक आहेत. त्यांनी भरपूर कथासंग्रह लिहले आहेत. त्यामध्ये सखी, तप्तपदी हे कथासंग्रह वाचकांमध्ये लोकप्रिय आहेत.

व. पु. काळे मुंबई महानगरपालिकेत होते. पेशाने वास्तुविशारद होते. लेखक, कादंबरीकार, कथाकथनकार, अशी ख्याती असलेल्या व. पु. काळे अर्थात वसंत पुरुषोत्तम काळे यांचा जन्म २५ मार्च १९३३ रोजी झाला. आपण सारे अर्जुन, गुलमोहर, गोष्ट हातातली होती, घर हरवलेली माणस, दोस्त, माझ्या माझ्यापाशी, मी माणूस शोधतोय, वन फोर द रोड, रंग मनाचे, माणूस, वपुर्झा, हुंकार, असे पत्रसंग्रह, ललीतप्रकार खुपच प्रसिद्ध आहेत. तसेच तप्तपदी ठिकरी व वाट एकटीची यासारख्या कादंबरी खूपच गाजल्या, तसेच महाराष्ट्र शासनाचा उत्तम लेखकाचा सन्मान पु. भा. भावे पुरस्कार फाय फाउंडेशनचा पुरस्कार आणि अमेरिकेत आयोजित करण्यात आलेल्या साहित्य संमेलनात अध्यक्षपद बहाल केले गेले. आपल्या लिखाणातून जगण्याचे तत्त्वज्ञान सोप्या पण रंजक पद्धतीने सांगणारे थोर साहित्यिक म्हणजे वसंत पुरुषोत्तम काळे. 'वपु' या दोन अक्षरांनी महाराष्ट्राला परिचित असलेल्या व. पु. काळे यांचा वाचकविश्वात स्वतंत्र असा संप्रदाय आहे. वपुंनी ६०पेक्षा जास्त पुस्तकांचे लिखाण केले. त्यातील पार्टनर, वपूर्झा, ही वाट एकटीची यांचे कथाकथन त्यांनी स्वतः केले. या कथाकथनाला प्रेक्षकांनी भरपूर दाद दिली आणि ऑडिओ कॅसेटमधून घराघरात पोहोचणारे वपु पहिले लेखक ठरले. पेशाने आर्किटेक्ट असणारे वपु इमारतींच्या आराखड्याचे रेखन करण्यापेक्षा लेखन करू लागले आणि मराठी साहित्याला एक थोर साहित्यिक लाभला.

वपुंचे लिखाण चौफेर होते. कथा, ललित, नाटक, वैचारिक, चरित्र, आत्मचरित्र असे सर्व लेखन प्रकार त्यांनी हाताळले. लेखनातली विशेष बाब म्हणजे कथा संपताना कथेत अचानक येणारा ट्विस्ट. त्यांच्या कथा जिवंत माणसांच्या, नातेसंबंधांच्या, स्वैर वेड्या मनाचे विविध कंगोरे अधोरेखित करणाऱ्या असत. वपुंची कथा वाचताना डोळ्यासमोर कथेचे कथानक तरळते. कथा वाचून झाल्यावरही त्यातले एक एक प्रसंग स्लाइड शोप्रमाणे डोळ्यासमोरून सरकत राहतात. लेखकाला कथा आपली वाटावी असेच वपु लिहीत असत.

वपुंच्या पार्टनर, झोपाळा, आपण सारे अर्जुन, ऐक सखे, चतुर्भुज, काही खरं काही खोटं अशा अनेक पुस्तकांवर, त्यांच्या कादंबर्या आणि कथांवर वाचकप्रियतेची मोहोर उमटली आहे. त्यांचे 'पार्टनर' हे पुस्तक भरपूर लोकप्रिय आहे. त्यांच्या सर्व लेखनाचे, कथाकथनाचे श्रेय त्यांनी त्यांच्या पुण्याच्या चिंचोरे गुरुजींना दिले होते. व. पु. काळेंना 'महाराष्ट्र शासनाचा उत्तम लेखकाचा सन्मान', 'पु.भा.भावे पुरस्कार', 'फाय फाउंडेशनचा पुरस्कार' आणि अमेरिकेत आयोजित करण्यात आलेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद बहाल केले. निधनाआधी दोन वर्षापासून ते एका विचित्र मन स्थितीमध्ये होते. त्यांना निराशा आली होती. २६ जून २००१ रोजी मुंबई येथे हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचं राहत्या घरात निधन झाले.

**–साभार विकिपीडिया**

## क्लिक...क्लिक...!



**अलिबाग : तळ कोकणातील स्वच्छ व शांत समुद्रकिनारे पर्यटकांना कायमच खुणावत असतात.** (छाया : आदित्य अरविंद वैद्य)

## आरोग्य प्रहर

# आंबा पाण्यात भिजवून खाणे ठरेल फायदेशीर

उन्हाळ्यासोबत आता आंब्याचा सीझन सुरू झाला आहे. उन्हाळ्यात चवदार, स्वादिष्ट आंबा खाण्याची एक वेगळीच मजा असते. आंबा हे असे फळ आवडत नाही असे फार कमी जण असतील. आंब्याच्या चवीमुळे खाताना एक मनशांती मिळते. लहानांपासून मोठ्यापर्यंत सर्वांना आंबा खायला आवडतो. पण घरातील वृद्ध आजी, आई अनेकदा आंबा पिण्यात भिजवून मग खा असे सांगताना दिसतात, पण आंबा पाण्यात भिजवूनचं का खाल्याला जातो? यामागचे कारण जाणून घेणे महत्त्वाचे आहे.



लहानपणापासून आंबा खाण्यापूर्वी आई, वडील पाण्यात काहीवेळ भिजवत ठेवून मग आपल्याला खायला देताना पाहिल असेल. पण आंबा खाण्यापूर्वी भिजवण्यामागे केवळ रसायने, घाण आणि धूळ काढणे एवढाच उद्देश नसतो. तो धुवून न घेतल्यास त्याची गुणवत्ता आणि चवही खराब लागते.

**उष्णता कमी करण्यास मदत** : आंब्यामध्ये थर्मोजेनिक गुणधर्म असतात जे शरीराच्या कार्यावर परिणाम करतात. यात आंब्यात फार उष्णता असते आणि उन्हाळ्यातील उष्णतेत तुम्ही आंबे खाता तेव्हा तुमच्या शरीरातही उष्णता वाढते. ज्यामुळे पचनसंस्था आणि आतड्यांवर परिणाम होऊ शकतो, पण आंबे भिजवल्याने त्यातील उष्णता कमी होण्यास मदत होते, तसेच बद्धकोष्ठता, त्वचेच्या समस्या, डोकेदुखी आणि जुलाब यांसारख्या समस्याही बऱ्याच प्रमाणात कमी होतात. त्यामुळे आंबा अर्धा तास पाण्यात भिजवल्यास थर्मोजेनिक गुणधर्मही कमी होतात.

**विविध आजारांपासून संरक्षण** : कीटक, तण आणि विविध जंतूंपासून आंब्याच्या झाडाचे संरक्षण करण्यासाठी कीटकनाशके आणि रसायनांची फवारणी केली जाते, या रसायनांचा आपल्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो. कारण कीटकनाशकांमुळे त्वचेची जळजळ, मळमळ, श्वसनमार्गात जळजळ, ऍलर्जी, कर्करोग आणि डोकेदुखी इत्यादी समस्या उद्भवू शकतात.

आंबा भिजवून ठेवल्याने त्याच्या देटावरील चिटकपणा निघून जातो. आंब्याच्या देठावर पांढऱ्या रंगाचा एक चिकट पदार्थ बाहेर येतो ज्यामध्ये फायटिक ऍसिड असते, यामुळे आंब्याची चव वेगळी लागते.

**आंबा पाण्यात नक्की किती वेळ भिजवायचा?**

आंबे पाण्यात साधारण १५ ते २० मिनिटे भिजवून खावे. यामुळे आंब्यातील उष्णता कमी होते. जर आंबा न भिजवताच खाल्ला तर पोटाचे विकार वाढू शकतात.

# मत्स्यदुष्काळामुळे बाजारात शुकशुकाट

## मुरुडमध्ये होड्या किनारी विसावल्या; व्यावसायिक, खवय्यांना मासळीची प्रतीक्षा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड हे पर्यटनस्थळ असल्याने येथे दर शनिवार, रविवार पर्यटकांची गर्दी असते. पर्यटकांना आवडणारे मासे मात्र महाग झाल्याने स्थानिक नागरिकांसह पर्यटकांचीसुद्धा नाराजी वाढली आहे. कारण गेल्या अनेक दिवसापासून मासळी मिळण्याचे प्रमाण घटल्याने मासळी मार्केटमध्ये मासळी कमी येऊ लागली आहे. त्यामुळे पर्यटकांना आवडणारी मासळी चढ्या किमतीत विकली जात आहे. अचानक मासळी मिळण्याचे प्रमाण कमी झाले व त्यातच खवय्यांची नाराजी ओढवली गेली.

सध्या मासळी दर मोठ्या प्रमाणात वाढल्याने गरीब व मध्यमवर्गीयांनी मासळी घेणे टाळले आहे. मासळीची आवक कमी झाल्याने मुख्य शहरातील बाजारपेठा ओस पडल्या आहेत. खोल समुद्रात जाऊन सुद्धा तुरळकच मासळी मिळत असल्याने



खर्च जास्त व कमाई कमी प्रमाणात होत असल्याने आज समुद्र किनारी असंख्य होड्या उभ्या आहेत.

मुरुड तालुक्यात लहान व मोठ्या होड्या साडेसातशेच्या घरात असून मासळी मुबलक न मिळत असल्यामुळे ६० टक्के होड्या किनाऱ्यालाच आहेत. ७२ हजाराची लोकसंख्या असून सुद्धा निवळ मासेमारीवर खरेदी होत असल्याने बाजारपेठेमध्ये धंदाच मंदावला आहे. बाजारात गरजेपुरती खरेदी हे धोरण अवलंबिल्यामुळे धंदा मंदावला असून व्यापारावर मंदीची सावट आल्याचे बोलत जात आहे.

### दर भिडले गगनाला

आज किराणामाल विक्रेता, कापड विक्रेता व सर्व व्यवसाय ठप्प झाले असून एका मासळीवर बाजरपेठा शांत झाल्या आहेत. मासळी कमी मिळत असल्याने मुरुड, आगरदांडा, राजपुरी, कोर्लई, बोर्ली आदी भागातील होड्या किनाऱ्याला लागल्या आहेत. मासळी कमी मिळत असल्याने मासळीचे दर मात्र गगनाला भिडले आहेत.त्यामुळे पर्यटकांसह स्थानिक नागरिक हवालदिल झाले आहेत.

वातावरणातील बदलामुळे मच्छिमारांचे मोठे आर्थिक नुकसान होऊन ते कर्जबाजारी झाले आहेत. बदलत्या वातावरणाचा गंभीर परिणाम मच्छिमारांना सहन करावा लागला आहे. खोल समुद्रात जाऊन सुद्धा मुबलक मासळी मिळत नाही.त्यामुळे मच्छिमार पुरते हैराण झाले आहेत. सागर कन्या मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर मकु यांनी सांगितले, नियमाप्रमाणे तीन महिन्यांनी मिळणार परतावा २०२१ व २२चे प्रकरण पाठवले आहेत. मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगुंटीवार याना विनंती आहे, जिल्ह्यातील मच्छिमारांचा परतावा लवकरात लवकर काढावा अशी विनंती करीत आहोत.

> **खोल समुद्रात जाऊनसुद्धा मासळी मिळत नाही. रायगड जिल्ह्यातील मच्छिमारांसाठी खावटी योजना राबवून राज्य सरकारने मच्छिमारांना मदतीचा हात द्यावा.**
> **–मनोहर मकु, सागर कन्या मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष**

# जेएसडब्ल्यू कंपनीतून माल चोरी केल्याप्रकरणी त्रिकुटाला अटक

**पेण : प्रतिनिधी**

डोलवी येथील जेएसडब्ल्यू कंपनीतील फेरोनिओबियम स्टोअरमधून जवळ जवळ ६ लाखाचा फेरोनिओबियम धातू चोरी केल्याप्रकणी वडखळ पोलिसानी तिघांना अटक केली आहे.

याबाबत माहिती अशी कि, सोमवार २० मार्च सायंकाळी ७: ५६ ते मंगळवार २१ मार्च सायंकाळी ७: ५६ दरम्यान जे.एस.डब्ल्यु स्टील कंपनी डोलवी येथे फेरोनिओबियम स्टोअर मधून आरोपी नं. १ ते ३ रा.पेण, ता.पेण यांनी संगनमत करून फेरोनिओबियम स्टोअरमधून सुमारे २५० किलोग्रॅम वजनाचे फेरोनिओबियम धातुचे तुकडे कंपनीच्या परवानगी शिवाय घेवून जात असताना आढळून आल्याने फिर्यादी निशांत सनकाले रा.डोबिवली, पुर्व ठाणे यांनी त्यास थांबवून कंपनीचा एक जबाबदार अधिकारी या नात्याने ते फोरोनिओबियम धातुने भरलेल्या गोण्या त्यांनी ताब्यात घेवून आरोपींना प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला असता आरोपी नं. २ व ३ यांनी फिर्यादी निशांत सनकाले रा. डोबिवली, पुर्व ठाणे यांना मारहाण करून सदर फेरोनिओबियम धातुने भरलेल्या गोण्या जबरीने फिर्यादीच्या ताब्यातून खेचून पळून गेले. गुन्ह्यातील फेरोनिओबियम धातुचे २५० किलो ग्रॅम वजनाचे तुकडे प्रती किलो २५०० रुपये असा एकुण ६ लाख २५००० रुपये किमतीचा माल पोलिसांनी हस्तगत केला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे. याबाबत वडखळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जा.क्र. उनप/आरोग्य/३८४६/२०२२–२३
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड
दिनांक २४/०३/२०२३

## उरण नगरपरिषद, उरण
## निविदा सूचना

उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील खालील कामाकरिता अनुभवी ठेकेदाराकडून दोन सिलबंद निविदा दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १ | उरण नगरपरिषद हद्दिमध्ये विविध ठिकाणी रस्त्यावर फायबर स्पीड ब्रेकर पुरविणे व बसविणे. | २०००/– | ५००/– |

**अटी/शर्ती :–** उरण नगरपरिषद हद्दिमध्ये विविध ठिकाणी रस्त्यावर फायबर स्पीड ब्रेकर पुरविणे व बसविणे कामी अनुभवी अथवा नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोर बंद निविदा मागवीत आहे. निवीदा दिनांक २७–३–२३ पासून दिनांक ६–४–२३ पर्यंत साय. ४ : ०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी उरण नगरपरिषद यांच्या नावे दाखल करणचे आहे.

**१. इसारा रक्कम :–** कामाची इसारा रक्कम धनाकर्ष / रोखीने नगरपरिषद लेखा विभागात दिनांक ५–४–२३ रोजी सायं. ४:०० वाजे पर्यंत भरणेंचे आहे. ठेकेदार इसारा रक्कम भरणा करणार नाहीत अशा ठेकेदारांच्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**२. कोरे निवीदा नमुने :–** कोऱ्या निवीदाचे नमुने नगरपरिषदेच्या लेखा विभागात निवीदा शुल्क (न परतीचे) रोखीने भरणा केल्यास दिनांक ५–४–२३ रोजी सायं. ४:०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत नगरपरिषदेच्या आरोग्य विभागामध्ये उपलब्ध होतील.

निवीदा नमुने कोणत्याही परिस्थीतीत पोस्टाने पाठविली जाणार नाहीत. सदर कामाच्या अटी/शर्ती आणि सविस्तर निवीदा सूचना आरोग्य विभागामधून उपलब्ध होणार असून इच्छूक ठेकेदारांनी आरोग्य विभाग प्रमुख यांच्याशी संपर्क साधावा.

**सही/–**
**(राहुल इंगळे)**
मुख्याधिकारी
उरण नगरपरिषद उरण

# डोंगरी मठात स्वामी समर्थ प्रकट दिन उत्साहात साजरा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड डोंगरी येथील त्रिशाताई पाटील यांच्या मठात स्वामी समर्थ प्रकटदिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. सकाळी ५ वाजल्यापासून नामस्मरणाला सुरवात झाली. त्रिशाताईंच्या मार्गदर्शनाखाली होम हवन पार पडला. दुपारी महाआरतीनंतर महाप्रसादाचा लाभ हजारो भक्तांनी घेतला. त्यावेळी डॉ. दत्तात्रय पाटील आणि भक्तांनी नियोजन अतिशय सुंदर केल्याने प्रत्यक्ष भक्ताला दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेता आला.

त्याप्रसंगी माऊली त्रिशाताई म्हणाल्या भक्ताचा स्वामीसमर्थावरील निष्ठा व विश्वास असेल तर कोणत्याही कामात यश मिळणारच. स्वामी चरणावर डोके ठेवताना कोणताही स्वार्थ मनात ठेऊ नका. निस्वार्थी माझ्याकडून सेवा घडो अशीच स्वामींकडे मागणी करा. त्याचवेळी मन व बुद्धी स्थिर राहून सत्कर्माकडे देह वळतो आणि सत्यकर्मातील देह शारीरिक व्याधींपासून मुक्त होतो. त्रिशाताईंच्या मौलिक प्रवचनानंतर भक्तांनी आशीर्वाद घेतले

स्वामींशी सेवा झाल्यावर पालखी निघाली. मुंबईतील ढोल पथकांनी सुरवात झाली. हजारो स्वामीभक्तांनी पालखीला खांदा देऊन सेवा केली. संपूर्ण डोंगरी गावात पालखी फिरली. खऱ्या अर्थाने स्वामी प्रकट झाल्याची अनुभूती सर्व भक्तांना मिळाली. रात्री १० वाजता पालखी मंदिरात आली व स्वामी प्रकट दिनाची सांगता झाली. गेली अनेक वर्ष डोंगरी मठात प्रकट दिन साजरा होत आहे. यंदा प्रकट दिनाची जय्यत तयारी केल्याने मोठ्या प्रमाणात भक्त येथे उपस्थित होता.

# केंद्र शासनाच्या योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहचवा -अश्विनी पाटील

**खोपोली : प्रतिनिधी**

भाजप कार्यकर्त्यांनी बूथ सशक्तिकरण अभियान प्रभावीपणे राबवावे तसेच या अभियानाच्या माध्यमातून पक्ष संघटना वाढीसाठी, केंद्र शासनाच्या ज्या कल्याणकारी योजना आहेत त्याची माहिती जनसामान्यांना द्यावी, असे आवाहन भारतीय जनता पक्षाच्या उत्तर रायगड महिला जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आवाहन केले.



भारतीय जनता पक्षाच्या बूथ सशक्तिकरण अभियान यशस्वी करण्यासाठी स्थानिक पातळीवर खोपोली शहराच्या वेगवेगळ्या प्रभागात सध्या बैठकांचे सत्र सुरू आहे. शक्ती केंद्रप्रमुख संजय म्हात्रे यांच्या २९०, २९१, २९२ या बुथ प्रमुखांची बैठक स्वामी विवेकानंदनगर, मोगलवाडी येथील महिला जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या निवासस्थानी गुरुवारी पार पडली. या वेळी पाटील बोलत होत्या.

यावेळी त्यांनी बैठकीत अभियानाचा आढावा घेताना पदाधिकारी व कार्यकर्त्यांना वेगवेगळ्या जबाबदारी देऊन हे अभियान यशस्वी करण्याचे आवाहन केले. या वेळी वैद्यकीय सेलचे सहसंयोजक विकास नाईक खुरपडे यांनी अभियानाची माहिती दिली. बैठकीला भाजप खोपोली शहर सरचिटणीस हेमंत नांदे, प्रमोद पिंगळे, युवा नेते राहुल जाधव, चिटणीस गोपाळ बावस्कर, शहर उपाध्यक्ष दिलीप पवार, डॉक्टर बबन नागरगोजे, महिला मोर्चा शहर सरचिटणीस अश्विनी अत्रे, माजी नगरसेविका अनिता शहा, अपर्णा साठे, सुमिती महर्षी, युवा मोर्चा शहर अध्यक्ष अजय इंगुलकर अनिल कर्णक, संतोष चौधरी, ओबीसी सेलचे सुनील नांदे, इत्यार्दीसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीचा समारोप संजय म्हात्रे यांनी आभार प्रदर्शन करताना अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व कार्यकर्ते प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

| RFx No. | Description | Est. Cost |
|---|---|---|
| Tend-63/22-23 **7000026681** | Work of Providing Additional Jumper (T-clamp with jumper cone) for various EHV lines under EHV (O&M) Dn., Panvel **Tender Fee:** Rs. 500/- + GST | Rs. 42.04 Lakh |
| Tend-64/22-23 **7000026797** | Work of Anti Corrosive Painting of 220kV & 100kV line tower at KTL S/Dn., Mahad under EHV (O&M) Division, Mahad. **Tender Fee:** Rs. 500/- + GST | Rs. 99.90 Lakh |

**EMD** 1% of Estimated Cost **Submission of Bids:** From 23.03.2023 to 30.03.2023 up to 23:59 Hrs **Opening Date:** 31.03.2023 at 10:00 Hrs. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006220 e-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मौजे–नांदगाव, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | भोगवटादारांची नावे |
|---|---|---|
| २८/६ | ०–६०–७०<br>पो.ख. ०–०८–६०<br>एकूण ०–६९–३० | कोंडीराम राजाराम म्हात्रे<br>गणेश एकनाथ भोईर<br>गुलाब विष्णू गायकर<br>छाया विश्वास मेढेकर<br>जयदास कृष्णा भोईर<br>ज्योती जुगनु खुटले<br>ताराबाई एकनाथ भोईर<br>दिनकर राजाराम म्हात्रे<br>धोंडीराम राजाराम म्हात्रे<br>पदीबाई शिवाजी म्हसकर<br>बयव उर्फ बयोबाई<br>तुकाराम म्हात्रे<br>अशोक राजाराम म्हात्रे<br>मंदाबाई सिताराम पाटील<br>राधाबाई कृष्णा भोईर<br>रोहिदास एकनाथ भोईर<br>विजय परशुराम भोईर<br>शांताराम परशुराम भोईर<br>श्याम कृष्णा भोईर<br>सुनिल कृष्णा भोईर<br>सुरेश कृष्णा भोईर<br>संगीता सोमनाथ पाटील<br>संतोष एकनाथ भोईर<br>मारुती गोमा भोईर<br>कुंडलिक उर्फ<br>पुंडलिक हिरु भोईर<br>हरिश्चंद्र हिरु भोईर |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २४/०३/२०२३.

**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मो. क्र. : ९९३०३६९८६१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मौजे–नांदगाव, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | भोगवटादारांची नावे | इतर हक्कातील नावे |
|---|---|---|---|
| २९/२ | ०–९५–८०<br>पो.ख. ०–०९–९०<br>एकूण १–०५–७०<br>पैकी ०–७०–०० | कोंडीराम राजाराम म्हात्रे<br>गणेश एकनाथ भोईर<br>गुलाब विष्णू गायकर<br>छाया विश्वास मेढेकर<br>जयदास कृष्णा भोईर<br>ज्योती जुगनु खुटले<br>ताराबाई एकनाथ भोईर<br>दिनकर राजाराम म्हात्रे<br>धोंडीराम राजाराम म्हात्रे<br>पदीबाई शिवाजी म्हसकर<br>बयव उर्फ बयोबाई<br>तुकाराम म्हात्रे<br>मंदाबाई सिताराम पाटील<br>राधाबाई कृष्णा भोईर<br>रोहिदास एकनाथ भोईर<br>विजय परशुराम भोईर<br>अशोक राजाराम म्हात्रे<br>श्याम कृष्णा भोईर<br>सुनिल कृष्णा भोईर<br>सुरेश कृष्णा भोईर<br>संगीता सोमनाथ पाटील<br>संतोष एकनाथ भोईर<br>हरिश्चंद्र हिरु भोईर<br>शांताराम परशुराम भोईर<br>कुंडलिक उर्फ<br>पुंडलिक हिरु भोईर | कमला रामदार खुटले<br>जनाबाई बाळकृष्ण गायकर<br>दत्तात्रेय गोपाळ खुटले<br>नामदेव गोपाळ खुटले<br>मधुकर रामदास खुटले<br>अनिल धर्मा खुटले<br>वंदना गोमाजी मढवी<br>सुवर्णा धर्मा खुटले<br>भारती नंदकुमार हुद्दार<br>प्रविण धर्मा खुटले<br>विजय धर्मा खुटले<br>चंद्रकांत पांडूरंग फडके<br>विशाल पांडूरंग फडके |
| | ०–९५–८०<br>पो.ख. ०–०९–९०<br>एकूण १–०५–७०<br>पैकी ०–३५–७० | रजनी शशिकांत अध्यापक<br>सुगंधा सुरेश शहाणे<br>धिरेंद्र माधव आगटे<br>बलवंत वसंत खेर<br>मकरंद वसंत खेर<br>पदया राजाराम देसाई<br>वृंदा वसंत खेर | |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २४/०३/२०२३.

**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मो. क्र. : ९९३०३६९८६१

## जाहीर निविदा

दि. २४/०३/२०२३

### ग्रुप ग्रामपंचायत खरीवली, ता. खालापूर, जि. रायगड

सर्व बांधकाम ठेकेदार व रजिस्टर दुकानदार यांस जाहीर निविदाद्वारे कळविण्यात येते कि, ग्रामपंचायत खरीवली, ता. खालापूर, जि. रायगड यांजकडून ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग निधी योजनेअंतर्गत कामाच्या अनुभवी इच्छुक जीएसटीधारक ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी ज्या ठेकेदारांना सदरची कामे करावयाची आहेत त्यांनी आपली निविदा दि. २५/०३/२०२३ पासून ३०/०३/२०२३ पर्यंत ठिक स. ११ वा. वाजेपर्यंत समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावीत व सदर निविदा दि. ३१/०३/२०२३ रोजी ठीक स. ११:०० वा.मा.सरपंच, सदस्य, ठेकेदार यांच्या उपस्थितीत समक्ष उघडण्यात येतील कोणतीही एक अगर सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा.सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | योजनेचे नाव | इसारा रक्कम | काम पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | खरीवली आदिवासीवाडी शाळा शौचालय बांधणे | १०००००/– | १५ वित्त आयोग २०२१–२०२२ | १०००/– | ३ महिने |
| २ | कंरवेळी ठाकूरवाडी येथे नवीन बोरवेल व नळपाणी पुरवठा योजना तयार करणे. | २४८५९२/– | १५ वित्त आयोग २०२१–२०२२ | २४८५/– | ३ महिने |
| ३ | उजलोळी आदिवासीवाडी येथे विस्तारित नळपाणी पुरवठा पाईप लाईन तयार करणे. | १५००००/– | १५ वित्त आयोग २०२१–२०२२ | १५००/– | ३ महिने |
| ४ | खरीवली येथे पाण्याच्या टाकीला संरक्षण भिंत बांधणे. | ९३२५५२/– | १५ वित्त आयोग | ९३२५/– | ३ महिने |
| ५ | ग्रा.पं. हदीमध्ये मेडीक्लोर व T. C. L खरेदी करणे. | ७५८५८/– | १५ वित्त आयोग २०२१–२०२२ | ७५८/– | ३ महिने |
| ६ | मौजे करवेळी ठाकूरवाडी येथे ६६ कुटुंबाना वैयक्तिक नळ कनेक्शन देणे. | १३०३५०/– | १५ वित्त आयोग २०२१–२०२२ | १३०३/– | ३ महिने |

**अटी व शर्ती :–**

१) सदर कामाची कोरी निविदा दि. २५/०३/२०२३ पासून ३०/०३/२०२३ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध होतील.
२) निविदेसोबत एक टवका इसारा रक्कम ग्रामपंचायत खरीवली या नावाने भरल्याची पावती जोडणे आवश्यक आहे.
३) निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराला १०० रूपयाच्या बाँड पेपरवर करारनामा करून घ्यावा लागेल.
४) सदरचे काम पंचायत समितीकडील संबंधित तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायतीच्या देखरेखीखाली पूर्ण करावयाचे आहे.
५) काम पूर्ण झाल्यानंतर कामाच्या बिलातून ५ % सुरक्षा अनामत १ टक्के विक्रीकर २ टक्के आयकर करारवर ०.१५ टक्के सरचार्ज व १ टक्का मजूर विमा कामगार इत्यादि रकमा कपात केल्या जातील.
६) ठेकेदार शासकीय रजिस्टर व जीएसटी धारक असणे आवश्यक आहे.
७) सुरक्षा अनामत रक्कम कामाचा दर्जा पाहून ६ महिन्याने परत केली जाईल.
८) पोस्टाने आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाही.
९) दुकानदाराने वस्तू पुरवठा उत्तम दर्जाचा पुरविणे बंधनकारक राहील.

**सही /–**
**ग्रामसेवक**
ग्रामपंचायत खरीवली

ग्रा.पं. गोल शिक्का

**सही /–**
**सरपंच**
ग्रामपंचायत खरीवली

## निवडक

### श्री स्वामी समर्थ प्रकट दिनी भंडारा



**नवी मुंबई** : रिक्षा चालक-मालक संघटनेचे विद्यमाने श्री स्वामी समर्थ प्रकट दिन नेरूळमध्ये मोठ्या धार्मिक उत्साहात साजरा झाला. सेक्टर ८ येथील साई बाबा मंदिरात स्वामी समर्थांच्या पादुका व प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी मोठ्या संख्येने श्री स्वामी समर्थ सेवेकरी सहभागी झाले होते. सकाळी आरती व होमहवन विधिवत करण्यात आले. या वेळी आयोजित भंडारा व महाप्रसादाचा लाभ सेवेकरीनी घेतला. उत्सव यशस्वी होण्यासाठी रिक्षा चालक संघटनेचे पदाधिकारी सोपान जेजुरकर, बाबा कर्पे, शंकर सकपाळ, अनिल निकम, शामराव शेलार आदींनी मेहनत घेतली.

### किरवलीतून अल्पवयीन मुलीचे अपहरण

**पनवेल** : किरवली येथून अज्ञात इसमाने एका अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अल्पवयीन मुलीचे वय १५ असून अंगाने मध्यम, रंग गोरा, चेहरा उभट, उंची अंदाजे पाच फूट, केस काळे वाढलेले, डोळे काळे, ओठांचे खाली मसा, अंगात हिरवा अंबरेला घातलेला आहे. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक बळीराम घंटे (मो.७९७२१३४१६३) यांच्याशी संपर्क साधावा.

### रेल्वेच्या धडकेत अनोळखी तरुण ठार

**पनवेल** : जेएनपीटी ते पनवेल रेल्वेमार्गादरम्यान रेल्वेची धडक लागून एका अनोळखी तरुणाचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मृत तरुणाचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षे आहे. अधिक तपास सपोनि. वृषाली पवार करीत आहेत.

### इमारतीवरून पडून कामगाराचा मृत्यू

**पनवेल** : पनवेल येथील माझगांव डॉक हौसिंग सोसायटीमधील श्री. समर्थ बिल्डींगवरून पडून कामगारचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. बलजीतकुमार गौतम (वय ३१) असे या कामगाराचे नाव आहे. व्यवसायाने प्लंबर असलेल्या बलजीतकुमार श्री. समर्थ बिल्डींगवरून पडून त्याचा मृत्यू झाला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल चौगले करीत आहेत.

# 'अवकाळी'ने वीटभट्ट्यांचे मोठे नुकसान

## कच्चा माल, कोळसा भिजल्याने फटका





**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गेले काही दिवस अवकाळी पावसाचे संकट घोंगावत असतानाच दोन-तीन तास मुसळधार पडलेल्या पावसामुळे वीटभट्टीचालकांचे लाखोंचे नुकसान झाले आहे. पावसामुळे वीटभट्टीवरील कच्चा माल तुटून पडला आहे, तर लावलेल्या भट्ट्या कोलमडल्या आहेत. एकीकडे रॉयल्टीसाठी शासन तगादा लावत असताना दुसरीकडे सिमेंट ब्लॉकमुळे पारंपरिक मातीवीट व्यवसाय संकटात सापडलेला होता. आता अवकाळी पावसाने वीटभट्टी व्यावसायिकांसमोर मोठे संकट उभे केले आहे.

नवीन घर घेणे असो की ती उभे करणे त्यासाठी विटांची महत्त्वाची भूमिका असते. विटांशिवाय घराच्या भिंती उभ्या राहत नाहीत. वीट निर्मितीसाठी आजही पारंपरिक पद्धत वापरली जाते. कच्च्या मातीची साच्यात बनवलेली विट दगडी कोळशाची भट्टी लावून भाजली जाते. त्यानंतर भट्टीतून टणक बनलेली वीट बांधकामासाठी वापरली जाते. तालुक्यात ५००पेक्षा जास्त असलेल्या वीटभट्टींवर पावसाने अवकृपा केली आहे. त्यामुळे वीटभट्टी मजुरांनी बनवून वाळवायला ठेवलेला कच्चा माल तुटून पडला आहे, तर उघड्यावर ठेवलेला कोळसा भिजला आहे. त्याचबरोबर लावलेल्या भट्ट्यादेखील काही ठिकाणी कोलमडल्या आहेत. त्यामुळे तालुक्यात सर्व वीटभट्टी चालकांचे मिळून कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. पावसाच्या भीतीने काही ठिकाणी वीटभट्टी चालकांनी भट्टीवर प्लॅस्टिक आवरण टाकून झाकण्याचा प्रयत्न केला होता, मात्र तरीदेखील नुकसान झाले आहे.

**माझ्या भट्टीवर किमान २५ हजार कच्ची वीट तुटून पडली आहे. कोळसा भिजला आहे. हे नुकसान माझे मलाच सहन करायचे आहे, कारण शासन रॉयल्टी बघते. वीटभट्टीचालकांचे नुकसान झाल्यास त्याची नुकसानभरपाई शासन देत नाही. त्यामुळे तालुक्यातील वीटभट्टीचालकांवर मोठे संकट आहे.**

**-जगदीश पेरणे, वीटभट्टीचालक**

**तालुक्यात ५०० पेक्षा जास्त वीटभट्टी चालक-मालक आहेत. अवकाळी पावसाच्या संकटाने सगळ्यांनाच बेजार केले आहे. पावसाने वीटभट्टीचालकांना जेरीस आणले आहे. तुटलेला माल परत वापरात येणे अशक्य आहे. वीटभट्टीसाठी नुकसानभरपाई मिळत नाही. 'अवकाळी'ने वीटभट्टीचालकांचे मोठे नुकसान केले आहे. त्यामुळे शासनाने वीटभट्टीमालकांकडे लक्ष देण्याची गरज आहे.**

**-सुनील घोडविंदे, अध्यक्ष, बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स संघटना**

## 'ज्वेल ऑफ नवी मुंबई'तील तलाव स्वच्छ करावा

### आमदार मंदा म्हात्रे यांची मागणी



**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील ज्वेल ऑफ नवी मुंबई हे पर्यटनस्थळ म्हणून ओळखले जाते. सध्या त्याची दूरवस्था झाली आहे. तलावाची स्वछता करून सुशोभीकरण करावे, भगवान गौतम बुद्धांचा पुतळा बसवण्यासंदर्भात तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आमदार मंदाताई म्हात्रे यांनी आयुक्त राजेश नार्वेकर यांना एका निवेदनात केली आहे.

या निवेदनात आमदार मंदाताई म्हात्रे यांनी म्हटले की, ज्वेल ऑफ नवी मुंबई येथे पर्यटकही दैनंदिन फिरायला येत असतात. रोज ज्येष्ठ नागरिक व महिला येथे मॉर्निंग वॉकसाठी येत असतात, परंतु या तलावाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून तलावात गाळ साचला आहे. तलावात परिसरातील सांडपाणी सोडले जात असून कचरा व निर्माल्यही टाकले जाते. तसेच शेवाळे वनस्पती तसेच आजुबाजूचे सांडपाणी यामुळे तलाव प्रदूषित झाला असून परिसरात दुर्गंधी पसरली आहे.

याबाबत स्थानिक नागरिकांच्या वारंवार तक्रारी येत असून तलाव सुस्थितीत रहावा म्हणून महापालिकेकडून नेहमीच दुर्लक्ष होत आहे. तलावातील पाण्याची गुणवत्ता सुधारणे, तलावातील पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करणे, तलावात साचलेला गाळ काढणे, तलावातील अनावश्यक वनस्पती नष्ट करून त्यांची वाढ नियंत्रणात आणणे, किनारा सौंदर्यीकरण, कुंपण घालणे, जॉगिंग ट्रॅक करणे तसेच उद्यान विकसित करणे, कारंजा उभारणे व भगवान गौतम बुद्ध यांचा पुतळा उभारणे अशा मुख्य कामांनी तलावाचा विकास करणे आवश्यक आहे, तसेच आजूबाजूच्या परिसराचे सुशोभीकरण केल्यास पर्यटकांची संख्याही वाढेल.

### कामोठे येथे नाल्याजवळ आढळला मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे वसाहतीमध्ये विस्टा कॉर्नरजवळील नाल्याशेजारी एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळला आहे. कामोठे पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सेक्टर २१ येथे आढळलेल्या या मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध पोलीस घेत आहेत.

कामोठे पोलिसांनी हा मृतदेह ताब्यात घेऊन पुढील कार्यवाहीसाठी पाठवला आहे. या मृत व्यक्तीची ओळख पटलेली नसून या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कामोठे शहर पोलीस ठाण्यात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पादचारी महिलेचे दागिने लुबाडले; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

कामोठ्यात राहणाऱ्या एका ६७ वर्षीय वृद्धेजवळचे एक लाख रुपये किमतीचे दागिने लुबाडून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. कामोठे पोलिसांनी या भामट्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

सुजाता मोरे या कामोठे सेक्टर ३४मध्ये राहणाऱ्या मुलाच्या घरी जात होत्या. कामोठे ब्रिज ते मानसरोवर रेल्वेस्टेशनकडे जाणाऱ्या पदपथावरून जात असताना एका भामट्याने त्यांना अडवले व आपले साहेब गरीब महिलांना मोफत वस्तू वाटत असल्याचे सांगून सोबत येण्यास सांगितले. मोरे यांनी त्याला नकार दिल्यानंतरही भामट्याने त्यांना जबरदस्तीने नेऊन भुरसार बिल्डिंगच्या खाली पायरीवर नेऊन बसवले, तसेच त्यांच्या हातात एक कापडी पिशवी दिली. काही वेळातच तेथे आणखी एक भामटा आल्यानंतर दोघांनी मोरे यांना बोलण्यात गुंतवून त्यांच्या हातातील बांगड्या हातचलाखीने काढून घेतल्या. त्यानंतर रिकामी पिशवी त्यांच्याकडे देऊन त्याच ठिकाणी त्यांना बसण्यास सांगून पलायन केले.

काही वेळानंतर मोरे यांनी पिशवी तपासली असता, त्यात दागिने नसल्याचे त्यांच्या लक्षात आले.



**पनवेल : माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या अध्यक्षतेखाली प्रभाग १९ येथे बैठक घेण्यात आली. या वेळी विस्तारक संजय जैन, बूथ क्र. ४७२ अध्यक्ष लखन जाधव, महेश अनुरकर, रोशन जाधव, मुश्ताक बागवान, नूर शेख, याशिन पटेल, समिर गाजा, विनोद मंजुळे, निलेश धोत्रे, राकेश शिंदे, मेहबूब शेख उपस्थित होते. बैठकीत पक्षाच्या योजना, लाभार्थी, येणाऱ्या निवडणुका, जनतेच्या समस्यांविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली.**

## मानघर येथे श्री स्वामी समर्थ प्रकट दिन महोत्सव उत्साहात





**उरण : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील मानघर-मोसरे येथे श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकट दिन सत्संग सोहळा व मंदिराचा १२वा वर्धापन दिन गुरुवारी (दि. २३) मोठ्या उत्साहात साजरा झाला. यानिमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सुमारे पाच हजार भक्तांनी सत्संगाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला, असे संजय पाटील व राजेंद्र पाटील यांनी सांगितले. दर्शनासाठी जिल्हाभरातून भक्तगण आले होते. सकाळी स्वामी चरण पादुका व मूर्ती अभिषेक, समस्त देवता पूजन व आरती, भजन, दुपारी १२. ते १२.३० वा. अखंड भंडारा, हरीपाठ, सायंकाळी ७ ते ८ श्री स्वामींची पालखी सोहळा, रात्री महाराष्ट्र गाथा कार्यक्रम झाला. सायंकाळी ७ वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांची पालखी काढण्यात आली. पालखीत घोडे, बँजोच्या सुरात भक्तांनी नृत्य केले. शेवटी मंदिरा भोवती पाच प्रदक्षिणा घालण्यात आल्या. आरती घेण्यात आली तसेच भक्तांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत मोफत आरोग्य तपासणी शिबिर, नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर ठेवण्यात आले.

## नमुंमपा शाळांतील ३५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी दिला जलबचतीचा संदेश

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनानुसार जलजागृती सप्ताहाचे १६ ते २२ मार्च दरम्यान विविध उपक्रमांच्या माध्यमातून आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये आयुक्तांमार्फत महानगरपालिकेच्या सर्व सोशल माध्यमांवरून नागरिकांना जलबचतीचे आवाहन करण्यात आले. याशिवाय शहरात ठिकठिकाणी जलजागृती सप्ताहाचे होर्डींग प्रसारित करण्यात आले. हस्तपत्रके वितरित करण्यात आली. शहरातील विविध ठिकाणी असलेल्या एलईडी स्क्रीन्सवर जलबचतीचा संदेश प्रसिद्ध करण्यात आला.

अशा विविध प्रकारे संदेश प्रसारित करण्यासोबतच पाण्याचे महत्व विदयार्थ्यांना लहान वयापासूनच कळावे याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व ७९ शाळांमध्ये जलबचत विषयक विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

महापालिकेच्या ५६ प्राथमिक व २३ माध्यमिक शाळांमधील अनेक विद्यार्थ्यांनी हस्तफलक तयार करून त्यावर जलबचतीचे संदेश रेखाटले. काही शाळांमध्ये पाण्याचे महत्त्व पटवून देणाऱ्या विषयांवर चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांवर जलबचतीचे संस्कार करण्यासोबतच पालकसभा घेऊन पाणी बचतीचा संदेश प्रसारित करण्यात आला.

अनेक शाळांनी आपापल्या परिसरात जलजागृती करणाऱ्या प्रभातफेऱ्या काढून 'पाणी वाचवा, जीवन वाचवा' अशा विविध प्रकारच्या घोषणा देत जनसामान्यांना पाण्याचे महत्त्व पटवून दिले. काही शाळांमध्ये पाणी बचतीवर भाषणे तर दोन शाळांमध्ये पारंपारिक कीर्तनेही सादर झाली. काही शाळांनी आपल्या परिसरातील मुख्य रस्त्यांवर तसेच मुख्य चौकांमध्ये जलजागृतीपर पथनाट्ये सादर केली.

सर्वच्या सर्व ७९ शाळांमधील वर्गावर्गामध्ये पाणीबचतीची सामुहिक जलप्रतिज्ञा घेण्यात आली. प्रतिज्ञेनंतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाण्याचे महत्त्व सांगत पाण्याचा उपव्यय टाळणे, पाणी बचत याविषयी सविस्तर माहिती दिली.



## कोप्रोलीत विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात



**उरण : बातमीदार**

ॐ साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ कोप्रोली व श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या सौजन्याने गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर २१ व २२ मार्चदरम्यान श्री साईबाबांचे साई चरित्र पारायण व श्री सत्यनारायण महापूजा व साई भंडाऱ्याचे आयोजन कोप्रोली गावातील गणेश मंदिर येथे करण्यात आले होते.

श्री साई चरित्रपारायण वाचन, मध्यान्ह आरती, धूप आरती, शिवचरित्र व्याख्यान, कीर्तन, भजन, लोकगीत, भावगीत, महाप्रसाद आदी कार्यक्रम झाले. या धार्मिक कार्यक्रमांचा शेकडो नागरिकांनी लाभ घेतला. या कार्यक्रमाला भाजपचे उरण तालुकाध्यक्ष रवीशेठ भोईर, नगरसेवक राजू ठाकूर, पूर्व विभाग अध्यक्ष शशि पाटील, कल्पेश म्हात्रे आदी मान्यवरांनी भेट दिली.

ॐ साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ व साईसेवक, श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था, सर्व महिला बचत गट, माऊली हरिपाठ मंडळ, सर्व क्रिकेट क्लब, बापूजी देव थ्री व फोर व्हीलर चालक मालक संघटना कोप्रोली, ग्रामस्थ मंडळ कोप्रोली आदींनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

## मोबाइल खेचून त्रिकूट पसार


**पनवेल : वार्ताहर**

दुचाकीवरून उतरून फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीचा त्रिकुटाने मोबाईल खेचून पसार झाल्याची घटना चिंचपाडा ब्रिज ते मोठा खांदा गाव दरम्यान घडली आहे.

स्नेहल घरत हा आपला मित्रासोबत दुचाकीवरून खांदेश्वर रेल्वेस्टेशनला जात होता. चिंचपाडा ब्रिज ते मोठा खांदा दरम्यानच्या सर्व्हिस रोडवर दुचाकी थांबवून उतरल्यानंतर आपल्या मोबाईलवर बोलत असताना चिंचपाडा ब्रिजकडून नंबरप्लेट नसलेल्या दुचाकीवरून आलेल्या तीन व्यक्तींपैकी एकाने स्नेहलच्या हातातील मोबाईल खेचून पसार झाले. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



**पनवेल : परिक्षेत्र वन अधिकारी ज्ञानेश्वर सोनवणे यांना वाढदिवसानिमित्त तालुका भाजप उपाध्यक्ष संजय पाटील आणि वाकडीचे माजी सरपंच नरेश पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.**



वाचाल तर वाचाल!
जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

**जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...**

**वाचाल तर वाचाल हे नवे सदर दर महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी 'दैनिक राम प्रहर'च्या अंकात वाचा. या सदरात वाचा निवडक साहित्यिकांनी वाचलेल्या पुस्तकांविषयीचे रसग्रहण.**

**येत्या रविवारी, २६ मार्च २०२३ रोजी वाचूया डॉ. सुनील सावंत (मुंबई) यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.**

# ‘केकेआर’ला आणखी एक धक्का!

## अय्यर, फर्ग्युसनपाठोपाठ नितेश राणा जखमी

**कोलकाता : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीग २०२३चा हंगाम सुरू होण्यापूर्वी कोलकाता नाइट रायडर्स (केकेआर) संघाच्या अडचणी कमी होण्याचे नाव घेत नाही आहे. पाठीच्या दुखापतीमुळे संघाचा कर्णधार श्रेयस अय्यर या संपूर्ण मोसमातून बाहेर पडणे जवळपास निश्चित असतानाच या मोसमात संघाचा भाग असलेला वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसनला दुखापत झाल्याची बातमीही समोर आली आहे. त्याचबरोबर केकेआर संघाच्या फलंदाजीचा एक भाग असलेला नितीश राणालाही सराव सत्रादरम्यान दुखापत झाली आहे.



कोलकाता नाईट रायडर्स संघाच्या खेळाडूंनी घरचे मैदान ईडन गार्डन्सवर सराव सुरू केला आहे, ज्यामध्ये आतापर्यंत संघातील अनेक महत्त्वाचे खेळाडू सहभागी झाले आहेत. स्पोर्ट्सकीडा वेबसाईटच्या बातमीनुसार सराव सत्रादरम्यान नितीश राणाच्या डाव्या गुडघ्याला दुखापत झाली आहे. नेटमध्ये फलंदाजीचा सराव करताना राणा दुखापतग्रस्त झाला.

नितीश राणाने प्रथम एका नेटमध्ये वेगवान गोलंदाजांचा सामना केला, तर दुसऱ्या बाजूला फिरकी गोलंदाजांचा सामना केला. त्यानंतर तो थ्रो-डाऊनसमोर सराव करण्यासाठी जात असताना त्याच्या डाव्या गुडघ्याला चेंडू लागला. यानंतर त्याला तत्काळ मैदानाबाहेर काढण्यात नेण्यात आले. त्यानंतर त्याने पुढील सरावात भाग घेतला नाही.

पंजाबविरुद्ध पहिला सामना

आयपीएलच्या आगामी हंगामात कोलकाता नाईट रायडर्स संघ आपला पहिला सामना पंजाब किंग्ज संघाविरुद्ध खेळणार आहे. हा सामना १ एप्रिल रोजी मोहालीच्या मैदानावर होणार आहे. यानंतर संघ ६ एप्रिल रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध घरच्या मैदानावर दुसरा सामना खेळेल. केकेआरच्या संघाला श्रेयस अय्यरच्या अनुपस्थितीत आपल्या संघाच्या नवीन कर्णधाराची घोषणा करायची आहे, ज्यामध्ये नितीश राणाव्यतिरिक्त सुनील नरेन आणि शार्दुल ठाकूर यांची नावे सध्या आघाडीवर आहेत, पण राणा जखमी झाल्याने तो खेळणार की नाही हे अद्याप स्पष्ट व्हायचे आहे.

# मराठमोळ्या रूद्रांक्ष पाटीलची शानदार कामगिरी

## आयएसएसएफ विश्वचषक स्पर्धेत कांस्यपदक जिंकले



**भोपाळ : वृत्तसंस्था**

मध्य प्रदेशची राजधानी भोपाळ येथे सुरू असलेल्या आयएसएसएफ विश्वचषक स्पर्धेत मराठमोळ्या रूद्रांक्ष पाटील याने १० मीटर एअर रायफलमध्ये कांस्यपदक जिंकले. यासह भारताच्या पदकांची संख्या पाचवर गेली आहे.

सरबज्योत सिंगने बुधवारी १० मीटर एअर रायफलमध्ये सुवर्णपदक जिंकले होते, तर वरुण तोमर कांस्यपदक जिंकण्यात यशस्वी ठरला. वरुण हा बागपतचा रहिवासी आहे आणि सरबज्योत हरियाणातील अंबाला येथील आहे. रिदम सांगवान आणि वरुण तोमर यांनीही एअर रायफल मिश्र स्पर्धेत रौप्यपदक पटकाविले आहे. रूद्रांक्षने गुरुवारी नर्मदा नितीन राजूसह मिश्र स्पर्धेतही कांस्यपदक जिंकले होते. भारतीय नेमबाजांना चीनच्या नेमबाजांकडून ८-१६ असा पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे भारतीयांना कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

दुसरीकडे महिलांमध्ये भारताच्या दिव्या सुब्बाराजूने रँकिंग फेरी गाठली होती, पण तिला पदक जिंकता आले नाही. चीनची नेमबाज ली जुई सुवर्ण, वेई कियान कांस्य आणि जर्मनीची डोरेन वेनेकॅम्पने रौप्यपदक जिंकण्यात यश मिळविले. भारताने एक सुवर्ण, एक रौप्य आणि तीन कांस्यपदकांसह एकूण पाच पदके जिंकली आहेत. नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत जगातील ३३ देश सहभागी होत आहेत. या देशांचे ३२५ नेमबाज पदक जिंकण्यासाठी मेहनत घेत आहेत.

# सूर्यकुमारच्या बचावाबाबत कपिलकडून रोहितचे समर्थन



**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून सूर्यकुमार यादव आणि संजू सॅमसन हे दोघे सोशल मीडियावर खूप ट्रेंड करीत आहेत. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत सूर्यकुमार तिन्ही डावात गोल्डन डकचा बळी ठरला. त्यानंतर सोशल मीडियावर संजूला संघात प्राधान्य देण्याची चर्चा सुरू झाली. या सगळ्यादरम्यान टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माच्या बचावासाठी कपिल देव पुढे आले आहेत. सूर्यकुमारबाबत संघ व्यवस्थापन योग्य निर्णय घेत असल्याचे कपिल यांचे मत आहे.

कपिल देव एबीपी न्यूजशी बोलताना म्हणाले, ज्या क्रिकेटपटूने चांगली कामगिरी केली आहे त्याला अधिक संधी मिळतील. इथे सूर्याची संजूशी तुलना करायची गरज नाही. जर संजू देखील वाईट टप्प्यातून गेला, तर तुम्ही दुसऱ्याबद्दल बोलाल. असे होऊ नये. संघ व्यवस्थापनाने सूर्याला पाठीशी घालण्याचा निर्णय घेतला असेल, तर त्याला आणखी संधी द्यायला हवी. होय! लोक बोलतील, त्यांचे मतही मांडतील, पण शेवटी संघ व्यवस्थापनालाच निर्णय घ्यायचा असतो.

# धोनी-जडेजा पुन्हा आले एकत्र!

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएलचा आगामी हंगाम सुरू होण्यासाठी आता अवघे काही दिवस उरले असल्याने सर्व संघांनी तयारी सुरू केली आहे. व्यस्त वेळापत्रकामुळे अनेक खेळाडू उशिराने त्यांच्या फ्रँचायझींशी जोडले गेले. दरम्यान, चेन्नई सुपर किंग्जने एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये संघाचा कर्णधार महेंद्रसिंह धोनी आणि स्टार अष्टपैलू रवींद्र जडेजा दिसत आहेत.

गेल्या मोसमात धोनी आणि जडेजा यांच्यात बरेच वाद झाले होते, जिथे या दोघांमध्ये सर्व काही ठीक नाही अशा अफवाही पसरल्या होत्या, परंतु चेन्नई सुपर किंग्ज फ्रँचायझीने टीमच्या कॅम्पमधून शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये धोनी आणि जडेजा हसताना दिसत आहेत. गेल्या

## आयपीएलसाठी ‘सीएसके’ची तयारी



मोसमात वाद सुरू झाल्यानंतर हे दोन्ही खेळाडू पहिल्यांदाच एकमेकांना भेटले.

आयपीएल २०२२दरम्यान चेन्नई सुपर किंग्जने जडेजाला त्यांचा नवीन कर्णधार म्हणून नियुक्त करून सर्वांना आश्चर्यचकित केले होते, मात्र खराब कामगिरीमुळे स्पर्धेच्या मध्यभागी जडेजाला कर्णधारपद सोडावे लागले. त्यानंतर धोनीला पुन्हा एकदा कर्णधारपद देण्यात आले. धोनी कर्णधार झाल्यानंतरही संघाला फारशी चांगली कामगिरी करता आली नाही. १० संघांच्या स्पर्धेत ‘सीएसके’ला नवव्या स्थानावर समाधान मानावे लागले.

रवींद्र जडेजा अलीकडेच स्टार स्पोर्ट्सवर म्हणाला, मी माही भाईला सांगितले की, जामनगरमधील माझे प्रशिक्षक महेंद्रसिंग चौहान आणि सीएसकेमधील माझा कर्णधार महेंद्रसिंह धोनी यांच्यातला माझा क्रिकेट प्रवास आहे. माझा क्रिकेटचा प्रवास खरेतर या दोन महेंद्रसिंह यांच्यातील आहे.

चेन्नई सुपर किंग्ज संघ आयपीएल २०२३मध्ये त्यांच्या मोहिमेची सुरुवात गतविजेत्या गुजरात टायटन्सविरुद्ध करणार आहे. आयपीएलच्या आगामी मोसमातील पहिला सामना या दोन संघांमध्ये होणार आहे.

# मुकेश, मोहसीन यांच्या आयपीएल खेळण्यावर प्रश्नचिन्ह

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीग १६व्या हंगामाचा थरार ३१ मार्चपासून रंगणार आहे. त्याआधी चार वेळा चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्ज आणि लखनऊ सुपर जायंट्ससाठी खराब बातमी आली आहे. दोन्ही संघातील एक प्रमुख वेगवान गोलंदाज या स्पर्धेतून बाहेर जाऊ शकतो. चेन्नई सुपरजायंट्सचा मुकेश चौधरी आणि लखनऊ सुपरजायंट्सचा मोहसीन खान यांचे आगामी हंगामात खेळणे संशयास्पद मानले जात आहे.

मुकेश चौधरी आणि मोहसीन खान यांनी गेल्या वर्षी चमकदार कामगिरी केली होती. मुकेश किंवा मोहसिन या दोघांपैकी एकाचा लवकरच टीम इंडियात समावेश होईल, अशीही चर्चा होती. योगायोगाने दोन्ही वेगवान गोलंदाजांना प्रत्येकी २० लाख रुपयांच्या मूळ किमतीत फ्रँचायझीने खरेदी केले.

मुकेश चौधरी अद्याप चेन्नई सुपर किंग्जच्या शिबिरात दाखल झालेला नाही. तो राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये आहे. आयपीएलमधील चमकदार कामगिरीनंतर मुकेश महाराष्ट्राकडून लिस्ट ए सामन्यांमध्ये खेळला. त्याने १९ लिस्ट ए मॅचेसमध्ये २५ आणि १३ फर्स्ट क्लास मॅचमध्ये ३८ विकेट्स घेतल्या आहेत. याशिवाय २७ टी-२० सामन्यात ३२ विकेट्स आहेत.

लखनौ सुपर जायंट्सच्या मोहसीन खानने गेल्या मोसमात त्याने नऊ सामन्यांमध्ये १४ विकेट घेतल्या होत्या.

# इंग्लंडच्या द हंड्रेड स्पर्धेत बाबर, रिझवानला खरेदीदारच मिळाला नाही

## शाहीन आफ्रिदी मात्र मालामाल




**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

पाकिस्तानी स्टार फलंदाज बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान यांना मोठा धक्का बसला आहे. अलीकडच्या काळात या दोन्ही खेळाडूंनी आपल्या खेळाने सर्वांना प्रभावित केलशे आहे. असे असूनही त्याला इंग्लंडच्या प्रतिष्ठित लीग ‘द हंड्रेड’मध्ये त्यांना कोणीही खरेदीदार मिळालेला नाही. इतकेच नाही तर वेस्ट इंडिजचा स्फोटक अष्टपैलू खेळाडू आंद्रे रसेल, किरॉन पोलार्ड आणि न्यूझीलंडचा स्टार वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्ट या दिग्गजांनाही या वेळी ड्राफ्टमध्ये स्थान मिळवता आले नाही.

जिथे पाकिस्तानी कर्णधार बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान यांना या वेळी कोणीही खरेदीदार मिळालेला नाही, तिथे शाहीन आफ्रिदी आणि हरिस रौफ यांनी आपली जागा वाचवण्यात यश मिळवले आहे. आफ्रिदीला वेल्श फायरने एक लाख पौंड म्हणजेच सुमारे एक कोटी रुपयांसह आपल्या संघात सहभागी करून घेतले आहे.

‘द हंड्रेड’साठी गुरुवारी खेळाडूंचा मसुदा तयार करण्यात आला. यासह आठही संघांनी आगामी हंगामासाठी आपापल्या टीम्स पूर्ण केल्या आहेत. ‘द हंड्रेड’चा तिसरा सीझन ॲशेस मालिकेनंतर सुरू होईल अशी अपेक्षा आहे. सर्व संघांमध्ये सध्या १४-१४ खेळाडू आहेत. संघ वाइल्ड कार्डद्वारे आणखी दोन देशांतर्गत खेळाडूंना जोडू शकतात.

# शिखर धवन आता टीव्ही सिरियलमध्ये? व्हिडीओ शेअर



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा डावखुरा सलामीवीर शिखर धवनला सध्या टीम इंडियाच्या तिन्ही फॉरमॅटमधून वगळण्यात आले आहे. निवडकर्त्यांनी त्याला कसोटी आणि टी-२०मधून आधीच वगळले होते, पण आता त्याला एकदिवसीय संघातूनही वगळण्यात आले आहे. धवन सध्या संघाबाहेर असून सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. त्याने एक व्हिडीओ शेअर केला आहे, जो त्याच्या टीव्ही डेब्यूकडे निर्देश करीत आहे.

भारतीय संघाचा दिग्गज सलामीवीर शिखर धवन हा विनोदी आहे. त्याच्या अभिनयाचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. शिखर धवनने आता कुंडली भाग्य या टीव्ही सीरियलमध्ये काम केल्याची बातमी चर्चेत आहे. समोर आलेल्या फोटोमध्ये भारतीय सलामीवीर पोलिसांच्या ड्रेसमध्ये दिसत आहे. अभिनेत्रीसोबतच को-स्टार अभिषेक कपूरही तिच्यासोबत दिसत आहे.

अंजुम फकीहसोबत शिखर धवननेही त्याच्या सोशल अकाऊंटवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. हा व्हिडीओ एका टीव्ही सीरियलच्या सेटवर शूट करण्यात आल्याचे समजते. व्हिडीओमध्ये शिखर धवन पोलीस वेशात दिसत आहे.

# गोलकीपरने १०१ मीटरवरून केला गोल; सर्व जण थक्क

**सँटिआगो : वृत्तसंस्था**

चिली फुटबॉल लीगमध्ये एका गोलरक्षकाने आपल्या जागेवर उभे राहून नेत्रदीपक शॉट मारून गोल केला. या गोलचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. गोलरक्षकाचा हा गोल पाहून सर्व चाहते आश्चर्यचकित झाले आहेत. सोशल मीडियावर गोलकीपरचे खूप कौतुक होत आहे.



या सामन्यात अर्जेंटिनाचा गोलकीपर लिएंड्रो रिकेना केब्रेसल संघाकडून खेळत होता. बॉल त्याच्या बॉक्सपर्यंत पोहचला आणि सर्व खेळाडू त्याच्या दिशेने धावत आले. अशा स्थितीत रिकेनाने पूर्ण ताकदीनिशी किक मारली आणि चेंडू थेट विरोधी संघाच्या यष्टीरक्षकासमोर पडला आणि त्याच्या डोक्यावरून बाऊन्स होऊन गोलपोस्टच्या आत गेला.

विरोधी संघाच्या गोलरक्षकाने चेंडू रोखण्याचा पुरेपूर प्रयत्न केला, मात्र त्याला यश आले नाही. आता या गोलचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अनेक चाहते आणि क्रीडा पंडित दावा करतात की हा आतापर्यंतचा सर्वांत लांब गोल आहे. मात्र याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. रिकीनाने १०१ मीटर अंतरावरून हा गोल केला आहे. या सामन्यात केब्रेसल संघाने कोलो-कोलो संघाचा ३-१ असा पराभव केला.

# विराट-अनुष्का करणार गरजूंची ‘सेवा’

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार व आघाडीचा फलंदाज विराट कोहली आणि अभिनेत्री अनुष्का शर्मा यांनी आपापल्या फाउंडेशनला विलीन करून ‘सेवा’ हा नवा उपक्रम सुरू केला आहे. विराट-अनुष्का यांनी संयुक्त निवेदन जारी करून याची अधिकृत घोषणा केली आहे. हा नवीन उपक्रम गरजू लोकांना मदत करेल तसेच कोणत्याही विशिष्ट कारणापुरता मर्यादित नसेल, असे या स्टार जोडप्याने ‘सेवा’ लाँच करताना सांगितले.



विराट आणि अनुष्का यांनी संयुक्तपणे म्हटले की, खलील जिब्रान यांच्या शब्दात सांगायचे तर जीवनच जीवन देते. त्यामुळे तुम्ही जे स्वतःला देणारे समजता ते फक्त साक्षीदार आहात. ही भावना लक्षात घेऊन जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचण्याच्या उद्देशाने आम्ही सेवेच्या माध्यमातून एकत्र काम करण्याचा निर्णय घेतला आहे तसेच सेवेचे कार्य कोणत्याही विशिष्ट मुद्द्यापुरते मर्यादित राहणार नाही. ते पुढे चालूच राहील. मानवतेला आधार देत सामाजिक हितासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज असल्याचेही या स्टार जोडप्याने स्पष्ट केले.

विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांनी यापूर्वीही सामाजिक कार्य आणि समाजाच्या भल्यासाठी योगदान दिले आहे. कोविड-१९दरम्यान या जोडप्याने पंतप्रधान मदत निधी आणि महाराष्ट्र मुख्यमंत्री मदत निधीला सुमारे ११ कोटी रूपये दिले होते. याशिवाय किंग कोहलीची पत्नी अभिनेत्री अनुष्का ही शर्मा निमल वेल्फेअर एनजीओ ‘पेटा’शी देखील संबंधित आहे. तर विराट हा ॲथलिट डेव्हलपमेंट प्रोग्रामद्वारे (एडीपी) खेळाडूंना शिष्यवृत्ती देण्याचे काम करतो.

आतापर्यंत विराट कोहली व्हीके फाउंडेशन चालवत होता. या माध्यमातून नवीन खेळाडूंना आर्थिक मदत केली जाते. त्याचवेळी अनुष्का शर्माचे फाउंडेशन मुक्या प्राण्यांसाठी काम करायचे. अशातच दोघांनीही आपले फाउंडेशन विलीन करण्याचा निर्णय घेतला आहे. लक्षणीय बाब म्हणजे दोघांनीही आपल्या फाऊंडेशनचे नाव ‘सेवा’ असे ठेवले आहे, जे मानव आणि प्राणी दोघांसाठी काम करेल.

दरम्यान, या फाउंडेशनच्या नावानेच ‘विरूष्का’च्या चाहत्यांची मने जिंकली आहेत. ‘सेवा’ या नावात विराट, वामिका (मुलगी) आणि अनुष्का यांच्या नावाचा उल्लेख आहे.




अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे प्रमुख कार्यवाह,
नियामक मंडळ सदस्य, मुंबई
श्री. शामनाथ पुंडे
यांना वाढदिवसानिमित्ताने हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक : प्रणित गोंधळी, मनोज वासकर


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com